संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018
महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २७३ * * अकोला * रविवार, दिनांक ३० मार्च २०२५ ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## प्रत्येक प्रकरणात वाद कशाला?

### 'वाघ्या' कुत्र्याच्या शिल्पावरून फडणवीसांनी सुनावले....

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :** वाघ्या कुत्र्या संदभार्तील स्मृती स्थळावरून सगळ्यांशी चर्चा करावी लागणार आहे. त्यासाठी होळकर यांनी पैसे दिले आहेत, हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे या प्रकरणात सर्वांशी चर्चा करून, वाद न करता मार्ग निघू शकतो. प्रत्येक गोष्ट वाद केलाच पाहिजे का? तर असे काही नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांनी आज तुळजापूर आणि पंढरपूर येथील मंदिर परिसरात सुरु असलेल्या कामांची पाहणी केली. या वेळी ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

वाघ्या कुत्र्या संदभार्तील स्मृती स्थळावरून वाद निर्माण करून काहीही होणार नाही. धनगर समाज एकीकडे आणि मराठा समाज एकिकडे हे कशासाठी? हे अतिशय अयोग्य आहे. या विषयावर बसून मार्ग काढता येईल, असे देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

या संदर्भात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संभाजी महाराज यांना अनेक वेळा भेटण्याची वेळ दिली आहे. ते माज्याशी फोनवर देखील बोलतात. ते मला येऊन देखील भेटतात. त्यामुळे त्यांना वेळ न देण्याचे काहीही कारण नसल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

वाघ्या कुत्र्याच्या स्मृती स्थळावरून युवराज संभाजीराजे यांनी देवेंद्र फडणवीस यांना भेटण्याची वेळ मागितली असून त्यांची वेळ मिळाली नसल्याचे म्हटले होते. मात्र ते मला कधीही भेटू शकतात, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा दावा फेटाळला आहे.



## पीएम मोदींचा दौरा



पोलिसांनी घेतला व्यवस्थेचा आढावा
उड्डाणपूल बंद

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २९ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी सकाळी नागपूर दौऱ्यावर येत आहेत. सकाळी ९ ते दुपारी १ वाजतापर्यंत ते नागपुरात असतील.

त्यांच्या दौऱ्यानिमित्त कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, शनिवारी शहर वाहतूक पोलिसांनी विविध मार्गांवर वाहतूक व्यवस्थेची तपासणी केली. या दरम्यान सदर आणि सीताबर्डी उड्डाणपूल बंद ठेवून रविवारी येणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यात आला. या दरम्यान अचानक उड्डाणपूल बंद करण्यात आल्याने नागरिकांना काही चौकांमध्ये वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

जाणकारांच्या मते, रविवारी वर्धा रोडसह शहरातील रस्त्यांवर सामान्यतः वाहनांची संख्या कमी असते. त्यामुळे मोदींचे आगमन ते आरएसएस मुख्यालय, दीक्षाभूमी भेट व माधव नेत्रालयाच्या कार्यक्रमात सामील होतपर्यंत नागरिकांना खूप अधिक अडचणींचा सामना करावा लागणार नाही.

शनिवारी वाहतूक विभागाकडून पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या वेळी वाहतूक व्यवस्था कशी असेल याची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी बर्डी, आरबीआय चौक, वर्धा रोड, बैद्यनाथ चौक येथे वाहनांच्या रांगा लागल्या. पंतप्रधानांच्या सुरक्षा कारणास्तव काही मार्ग तात्पुरते बंद केल्याने पर्यायी रस्त्यांवर वाहतूक वाढली व जामची स्थिती निर्माण झाली. शहरातील सर्वात व्यस्त भागांपैकी एक बर्डी चौकात वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. आरबीआय चौकातही जाम लागल्याने प्रवाशांना गंतव्यावर वेळेत पोहोचता आले नाही.

**बैरिकेडिंग व पर्यायी मार्ग**

पंतप्रधान मोदी विमानतळावरून थेट आरएसएस मुख्यालयात जातील. त्यांचा ताफा वर्धा रोड, रहाटे चौक, काँग्रेसनगरमार्गे महालकडे जाईल. पोलिसांनी शनिवारपासूनच अनेक ठिकाणी बैरिकेड्स लावले आहेत.

## बळीसंख्या १ हजारापेक्षा अधिक




■ **वृत्तसंस्था, नायपिडॉ, दि. २९ :** शुक्रवारी झालेल्या ७.७ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपानंतर म्यानमारमध्ये मोठ्या प्रमाणात विध्वंस झाला आहे. मृतांचा आकडा १० हजारांपेक्षा जास्त असू शकतो. ही भीती युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सव्हेने व्यक्त केली आहे. भूकंपाचे धक्के थायलंड, बांगलादेश, चीन आणि भारतापर्यंत जाणवले.

म्यानमारच्या लष्करी सरकारने मृतांची संख्या १,००२ वर पोहोचल्याचे म्हटले आहे, तर २,४०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. दुसरीकडे, थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये एक ३० मजली इमारत कोसळली आहे. यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला आहे.

शुक्रवारी सकाळी ११:५० वाजता म्यानमारमध्ये ७.७ तीव्रतेचा भूकंप झाला. म्यानमार आणि थायलंडमध्ये गेल्या २०० वर्षांतील हा सर्वात मोठा भूकंप आहे. मोठ्या प्रमाणात झालेल्या विध्वंसामुळे म्यानमारच्या ६ राज्यांमध्ये आणि संपूर्ण थायलंडमध्ये आणीबाणी लागू करण्यात आली आहे. शनिवारी दुपारी म्यानमारमध्ये पुन्हा भूकंपाचा धक्का बसला. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.१ मोजण्यात आली.

## १६ नक्षलवाद्यांना कंठस्नान

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २९ :** छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यातील केरलापालच्या जंगल परिसरात सुरु असलेल्या चकमकीत १६ नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे. आज, सकाळी ८ वाजतापासून ही चकमक सुरु होती. मृत नक्षलवाद्यांची संख्या वाढू शकते, अशी शक्यता छत्तीसगड पोलिसांनी वर्तवली आहे.

जिल्ह्याच्या केरलापाल जंगल परिसरात मोठ्या संख्येने नक्षलवादी एकत्र आल्याची गोपनीय माहिती सुरक्षा दलाला मिळाली होती. यावरून सुकमा पोलीस दलाचे डीआरजी पथक आणि बिजापूर जवानांनी २८ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास संयुक्तपणे नक्षलविरोधी अभियान राबविले होते. दरम्यान, २९ मार्चला सकाळी ८ वाजताच्या सुमारास पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक उडाली.

यावेळी दोन्ही बाजूने मोठ्या प्रमाणात गोळीबार करण्यात आला. यात १६ नक्षलवादी ठार झाले. तर दोन डीआरजी जवान जखमी झाल्याची माहिती आहे.

## संयुक्त राष्ट्रांकडून ४३ कोटी रुपयांची मदत

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २९ :** भूकंपानंतर, भारताने १५ टन मदत साहित्य आणि ८० एनडीआरएफ बचाव कर्मचाऱ्यांची टीम म्यानमारला पाठवली आहे. त्याला 'ऑपरेशन ब्रह्मा' असे नाव देण्यात आले आहे. त्याच वेळी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्यानमार पीपल्स गव्हर्नमेंटचे प्रमुख जनरल मिन आंग ह्लाईंग यांच्याशी चर्चा केली.

पंतप्रधान म्हणाले की, जवळचा मित्र आणि शेजारी म्हणून भारत या कठीण काळात म्यानमारच्या जनतेसोबत खंबीरपणे उभा आहे.

संयुक्त राष्ट्रांनी म्यानमारला मदत कार्यक्रम सुरू करण्यासाठी ५ दशलक्ष डॉलर्स (४३ कोटी रुपये) दिले. रशियाच्या आपत्कालीन मंत्रालयाने १२० बचाव कर्मचारी आणि आवश्यक साहित्य घेऊन दोन विमाने पाठवली. चिनी बचाव पथक प्रथम पोहोचले. हाँगकाँग, सिंगापूर आणि मलेशिया देखील बचाव पथके पाठवतील.



















# २ तासात पालकमंत्र्यासमोर ६०० तक्रारींचा ढीग

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि.२९ : जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे शुक्रवारी (दि.२८) शहरात होते. त्यांनी नियोजन भवनमध्ये सर्वसामान्यांसाठी जनसंवादचे आयोजन केले होते. यावेळी अवघ्या दोन तासात जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांनी तब्बल सहाशे तक्रारीवजा निवेदन न्याय मिळण्याच्या अपेक्षेने पालकमंत्र्यांना दिले आहे. यावरुन शासकिय यंत्रणेमध्ये जेनतेच्या तक्रारींना सहजासहजी न्याय मिळत नसल्याचे पालकमंत्र्यांकडे पोहचलेल्या निवेदनाच्या संख्येवरुन समोर येत आहे. दरम्यान आज ज्यांनी निवेदन दिलेले आहेत, त्यांच्या निवेदनावर झालेल्या कारवाईबाबत संबधित नागरिकाला आठ दिवसात माहीती मिळणार आहे.



नागरिकांच्या प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी पालकमंत्र्यांनी शुक्रवारी नियोजन भवनात जनसंवादचे आयोजन केले होते. यासाठी दुपारी एक ते तीन ही नियोजित वेळ होती. त्यासाठी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिक उन्हा-तान्हातन्यायाच्या अपेक्षेने पोहचले होते. नियोजन भवनात चिक्कार गर्दी झाल्यामुळे शेकडो नागरिकांना नियोजन भवनाच्या खाली कापडी मंडपात थांबवण्यात आले होते. जनसंवादमध्ये जवळपास सहाशे तक्रार, निवेदन पालकमंत्री यांना प्राप्त झाले आहेत. या सर्व निवेदनांची विभागनिहाय वर्गवारी करुन सोमवारी संबधित विभागांकडे पाठविण्यात येणार आहे.

निवेदनावर होणाऱ्या कारवाईबाबत संबधितांना आठ दिवसात नियोजन भवन ईमारतीत असलेल्या पालकमंत्री कार्यालयात माहीती मिळेल.

अनिल भटकर, निवासी उपजिल्हाधिकारी

अनेक विभागाचे अधिकारी चार तास नियोजन भवनात जनसंवाद कार्यक्रमाला कोणत्याही विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित नव्हते. जसे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यपालन अधिकारी, मनपा आयुक्त. यावेळी कनिष्ठ अधिकारी हजर होते. मात्र पालकमंत्र्यांनी एक, दोन प्रकरण वगळता इतर कोणत्याही तक्रारींवरून संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली नाही. यावेळी अनेक अधिकारी नियोजन भवनमध्ये चार तास थक्क बसून होते. वास्तविकता आज या आठवड्यातील शेवटचा वर्कींग डे होता. आता थेट मंगळवारी शासकिय कार्यालय सुरू होतील.

त्यामुळे आज कार्यालयांमध्ये नागरीक कामांसाठी गेले तर साहेब पालकमंत्री साहेबांच्या बैठकीसाठी गेले आहेत, असे उत्तर सर्वसामान्यांना काही शासकिय कार्यालयांमध्ये गेल्यानंतर मिळाले.

# नवीन आर्थिक धोरणांचे ग्रामीण कृषक समाजावर भीषण परिणाम : डॉ. प्रदीप मेश्राम

## विद्यापीठात पंधरावे राज्यस्तरीय अधिवेशनाचे दुसरे सत्र संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि.२९ : नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करून आज तीस पेक्षा जास्त वर्षे झालीत. ग्रामीण कृषक समाजावर अलीकडे त्याचे भीषण परिणाम दिसून आले आहेत. शेतीतील वाढता खर्च, घटते उत्पन्न, पर्यावरणीय प्रश्नांमुळे निसर्गाचा ढासाळलेला समतोल, वाढत्या शेतकरी आत्महत्या, शेतमालाला भाव नसणे, कृषक स्त्रियांच्या वाढत्या समस्या, भौतिक सुविधांच्या अभावांची भीषणता अशा अनेक कारणांमुळे ग्रामीण कृषक समाज संकटात सापडलेला आहे. शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही ग्रामीण भागात असणारी हलाखीची परिस्थिती कृषक जीवनात अनेक संकटे निर्माण करणारी आहे. समाजातील रूढीवादी धारणा, जातिव्यवस्था यांमुळेही कृषक समाजातील प्रश्न बिकट बनले आहेत. यावर उपाय म्हणून समाजशास्त्रातील अभ्यासक आणि संशोधकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी





महाराज विद्यापीठातील समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आणि सत्राचे प्रमुख वक्ते डॉ. प्रदीप मेश्राम यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग आणि विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषद, ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन आर्थिक धोरणाचा ग्रामीण कृषक समाजावर पडलेला प्रभाव या विषयावर दोनदिवसीय पंधराव्या राज्य अधिवेशनाचे दुसरे सत्र संपन्न झाले. यावेळी विचारमंचावर अध्यक्षस्थानी वर्धा येथील प्रियदर्शनी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. धनंजय सोनटक्के, विषयतज्ज्ञ म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अशोक बोरकर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. धनंजय सोनटक्के यांनी नवीन आर्थिक धोरणांच्या पार्श्वभूमीचा वेध घेऊन ग्रामीण जीवनात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यांमुळे निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नांचा वेध घेतला. या सामाजिक प्रश्नांमधील कृषक समाजातील ढासळत असलेल्या परिस्थितीचा वेध घेतला. कृषक समाजातील वाढता कर्जबाजारीपणा, असहायता याकडे त्यांनी लक्ष वेधले. डॉ. अशोक बोरकर यांनी समाजशास्त्राच्या सैद्धांतिक चौकटीतून ग्रामीण कृषक समाजातील बदलांचा वेध घेतला. नवीन आर्थिक धोरणाची व्यापकता आणि त्याचे दूरगामी परिणामांच्या चौकटीत त्यांनी ग्रामीण कृषक समाजातील विविध घटकांवरील परिणामांवर मौलिक चर्चा केली. विविध सामाजिक समस्यांमधील आंतरसंबंधांचा वेध घेऊन ग्रामीण कृषक समाजातील दारिद्र्य, ताणतणाव आणि सामाजिक विषमतांच्या सुरु असणाऱ्या पुनरुत्पादानाकडे लक्ष वेधले. नवीन आर्थिक धोरणाचे अर्थ-राजकीय प्रक्रिया आणि तिचा भारतीय समाज जीवनावरील परिणामांकडे लक्ष वेधून प्रामुख्याने ग्रामीण कृषक समाजातील वाढती अभावग्रस्तता, ताणतणाव आणि शोषण अशा विविध पैलूंवर या सत्रात चर्चा घडून आली.

सूत्रसंचालन श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीच्या समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनिता धोपटे यांनी, तर आभारप्रदर्शन श्री तुळशीरामजी जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, वाशिमचे समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. पद्मानंद तायडे यांनी केले.

यावेळी प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डीपीटीच्या कूर्मगतीने दिव्यांगांवर उपासमारी

## आंदोलन करण्याचा निवेदनातून इशारा

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि.२९ : डीपीटीच्या कूर्मगतीमुळे केवायसी होत नसल्याने संजय गांधी, श्रावण बाळ, इंदिरा गांधी योजनेच्या ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग लाभार्थींवर सध्या उपासमारीची वेळ आली आहे. कारण, केवायसी अभावी त्यांच्या खात्यात दरमहा १५०० रु.ची रक्कमच जमा होईनाशी झाली आहे. अमरावती शहरात ५५ हजार संजय गांधी योजना श्रावणबाळ योजना इंदिरा गांधी योजनेअंतर्गत लाभ घेणारे लाभार्थी आहेत. मात्र, आठवडाभरात अमरावती तहसीलमध्ये केवळ लोकांची डीपीटी होत आहे. मनुष्यबळ नसल्यामुळे ५० डीपीटी होत आहेत. यासाठीही त्या लोकांना वारंवार चकरा मारत व रांगेत तासन तास उभे राहवे लागत आहे. तरी ही त्यांचे काम होत नाही व रांगेतून नंबर लागला तरी हा दस्तावेज नाही, तो दस्तावेज नाही, तुमची



केवायसीच झाली नाही, असे सांगून त्याला परत पाठवले जात आहे. त्यांना वारंवार चकरा मारायला लावतात. काही लोकांचे अंगठे येत नाही त्यामुळे त्यांची केवायसी होत नाही व आधार कार्ड पण त्यांचे अपडेट होत नाही. अशा प्रकारामुळे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग हवालदील झाले आहेत. ते केवळ या कार्यालयातून त्या कार्यालयात, बँकेत, एचडीओ, जिल्हाधिकारी कार्यालयात फिरत आहेत. कर्मचारी त्यांना सांगतात आमच्या हाती काही नाही. आता सगळं सरकारच्या हाती आहे.तुमचे कागद तहसील मध्ये दिले तर आम्ही सगळं करू शकतो, नाहीतर आमच्या हाती काही नाही. ज्या लाभार्थ्यांची डीपीटी मध्ये एन्ट्री झालेली आहे त्यांच्या बँक खात्यात एक ते दोन महिन्यांपासून पैसे आलेले नाहीत.

न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे शिवसेना ठाकरे गटाचे नेते प्रवीण हरमकर, उपशहर प्रमुख पंजाबराव तायवाडे, गोविंदा दायमा, विभाग प्रमुख मनीष रामावत, प्रभाग प्रमुख विनोद शर्मा, प्रभाग प्रमुख राजू हेरे, आनंद राठी विजय बेनोडकर, प्रमोद वानखडे, कमलेश गुप्ता, संदीप मानेकर, रुपेश वालेकर, निकेश शर्मा, अजीम लाला, आशुतोष सावरकर, श्रीकांत शर्मा यांच्यासह आदींनी निवेदनाद्वारे केली.

# संस्कृती संवर्धन समितीतर्फे स्वागतयात्रा

## मार्गातील मंदिरांना ध्वज प्रदान करण्यात येणार

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. २९ : शहरात संस्कृती संवर्धन समितीच्या वतीने नगराचे आराध्य दैवत श्री राज राजेश्वर मंदिरातून चैत्र शुक्ल १, प्रतिपदा शके १४०४७ अर्थात गुढीपाडवा रविवारी, मार्चला सकाळी वाजता हिंदू नववर्षाचे स्वागत करण्याकरिता स्वागत यात्रेचे आयोजन केले आहे. आर्य समाज मंदिर येथील सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत संस्कृती संवर्धन समितीचे अध्यक्ष प्रा.नितीन बाठे यांनी याबाबत माहिती देत या स्वागत यात्रेचा प्रारंभ महापूजेने होणार असल्याचे सांगितले. ही दुचाकी यात्रा राज राजेश्वर मंदिर, विठ्ठल मंदिर चौक, काळा मारुती, सिटी कोतवाली चौकातून मोठे राम मंदिर मार्गे जुना कपडा बाजार, जैन मंदिर,गांधी चौक, तहसील ऑफिस, श्री राणी सती मंदिर, श्री गुरुद्वारा प्रबंधक समिती न्यू राधाकिसान प्लॉट मार्गे अशोक वाटिका येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून मदनलाल धिंग्रा चौकातून टॉवर चौक, रतनलाल प्लॉट चौक,नेकलेस रोड मार्गे सिव्हिल लाइन चौकातून जवाहर नगर चौक, १२ ज्योतिर्लिंग मंदिर तेथून राऊत वाडी मार्गे जठारपेठ चौकातून संकल्प ढोल पथकाच्या सोबत सातव चौक मार्गे बिर्ला लेआऊट मधील जलाराम मंदिर येथून मार्गक्रमण करत समारोप बिर्ला राम मंदिर येथे महाआरतीने होणार आहे. तत्पूर्वी मंदिरात रामरक्षा पठण होणार आहे. या यात्रेतील मार्गात येणाऱ्या सर्व मंदिरांना ध्वज प्रदान करण्यात येणार आहे.

यामध्ये लाठीकाठीचे प्रात्यक्षिक आणि गुलाब बाबा बँड पथकाचा समावेश राहणार आहे. या यात्रेत अकोल्यातील नागरिक पारंपरिक वेशभूषेत, फेटे घालून सहभागी होणार आहेत. तसेच यात्रेत मर्यादा पूरुषोत्तम प्रभू श्रीराम, सीता माई, लक्ष्मण, राम भक्त हनुमान यांचा राम दरबार विशेष आकर्षण राहणार आहे. या नववर्ष स्वागत यात्रेत अकोल्यातील सर्व राष्ट्र प्रेमी नागरिक बंधु भगिनींनी सहपरिवार सहभागी व्हावे, असे आवाहन समितीचे स्वागत समिती अध्यक्ष अरविंद देठे, स्वागत समिती उपाध्यक्ष डॉ. पार्थसारथी शुक्ल, रामप्रकाश मिश्रा, डॉ. अभिजित नालट, मंगेश वानखडे, डॉ. प्रविण चव्हाण संस्कृती संवर्धन समिती, अकोलाचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे, संयोजक विनोद जकाते, सहसंयोजक स्वानंद कोंडोलीकर, राम भिरड, कोषाध्यक्ष शरद वाघ, महिला संयोजिका सोनल ठक्कर, रश्मी कायदे, मीनाक्षी आपोतीकर, प्रचार व प्रसार प्रमुख समीर थोडगे यांनी केले आहे, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

# वाढीव पाणी देयकप्रकरणी शिवसेना शिंदे गटाचा ठिय्या

## पाणी कर वाढीव बिलांची होळी, निषेध आंदोलन



**अकोला , दि. २९ :** मनपा पाणीपुरवठा विभागातर्फे चुकीच्या पद्धतीने नागरिकांना दिलेल्या पाणीपट्टीच्या देयकांसह नागरिकांना होणाऱ्या दूषित व गढूळ पाणीपुरवठ्याविरोधात शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक होत शुक्रवारी आंदोलन केले. पाणीपट्टीच्या वाढीव व अवास्तव बिलांची होळी करत निषेध व्यक्त केला. पाणीपट्टीत नागरिकांना चुकीची व वाढीव रक्कम आकारण्यात येत असून, त्यावर प्रशासनाचे दुर्लक्ष आहे, असा आरोप आंदोलकांनी केला. काही नागरिकांना सरासरीच्या कितीतरी पटीने बिल आकारले, असा आरोप करत शिवसेना शिंदे गटाने प्रशासनाला शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी केली. अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढवण्याचा इशारा यावेळी दिला. मनपा आवारात झालेल्या या आंदोलनात शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अश्विन नवले, अबब.. ४७ हजारांचे पाणीपट्टीचे बिल काही नागरिकांना सरासरीच्या कितीतरी पटीने पाणी देयके दिली. एका नागरिकाला ४७ हजारांचे पाणी बिल दिल्याचे आंदोलकांनी निर्दशनास आणले. चुकीची पाणी देयके दुरुस्तीसाठी नागरिकांना मनपा फेऱ्या माराव्या लागत असल्याचे आंदोलकांनी म्हटले. चुकीची देयके दुरुस्तीची मागणी यावेळी केली.

# सेनाड यांच्या रांगोळीची लंडन बुक्समध्ये नोंद


## भारतातील सर्वांत मोठी गणपती रांगोळी



**अकोला , दि. २९ :** अकोला सर्वाधिक गणपतींचा अद्वितीय संग्रह असलेल्या नंद उद्यान व गणपती संग्रहालयात नंद संग्रहालयातर्फे, नंद मित्र मंडळाच्या सहकार्याने मार्चला ऐतिहासिक उपक्रम यशस्वी झाला. १२,०००, स्केअर फूट क्षेत्रफळात, तब्बल अडीच हजार किलो रांगोळीचा वापर करून चित्रकार व कलाकार अमृता कुशल सेनाड यांनी गणपतीचे पोर्ट्रेट रांगोळीतून साकारून विक्रम प्रस्थापित केला. त्यांच्या अप्रतिम कलाकृतीने गणेशभक्ती, रांगोळी कलेचा सुंदर मिलाफ घडवला. हा अनोखा कलाविष्कार पाहण्यासाठी गणेशभक्त, कलाप्रेमींनी गर्दी केली होती. रांगोळीचे सौंदर्य पाहून उपस्थितांनी भारावून जाऊन त्याचे कौतुक केले. या उपक्रमाची नोंद लंडन बुक्स ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड, आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स संस्थानी घेऊन अमृता यांना त्याविषयीचे प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान केले. जिल्हा भाजपतर्फे अमृता यांचे विशेष कौतुक करून त्यांचा या वेळी मानचिन्ह देऊन सत्कार केला. ६५००० गणपती संग्रहाच्या प्रेरणेतून मिळाली कल्पना नंद उद्यान व गणपती संग्रहालयात प्रदीप नंद यांनी गेल्या वर्षांपासून संकलित केलेल्या हजार गणपतींच्या संग्रहाच्या प्रेरणेतून, देशातील सर्वांत मोठी गणपतीची रांगोळी साकारण्याचा ऐतिहासिक विक्रम घडवण्यात आला. या उपक्रमाची प्रेरणा घेण्यात आली.

# देवघरासाठी मिनी गुढी ६० ते ३०० रुपयांपर्यंत


■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि.२९ : अमरावती साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या पाडव्याच्या शुभमुहूर्तावर घरोघरी गुढी उभारली जाते. गुढीची पूजा करून नववर्षाचे स्वागत केले जाते. पूर्वीच्या काळी उंच-उंच गुढी उभारण्याची स्पर्धा असायची; परंतु आता फ्लॅट संस्कृती आल्याने गुढ्यांची उंची कमी झाली आहे. त्यामुळे बाजारात रेडिमेड मिनी गुढी विक्रीसाठी उपलब्ध झाली आहे. त्या ६० रुपयांपासून ते ३५० ते ४०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. यंदा मागणी टक्क्यांनी वाढल्याने व्यावसायिक सांगतात. रेडिमेड



गुढी ही कमी जागेत उभारता येते. त्यामुळे छोटी काठी, छोटा तांब्या, नक्षीदार साडी आणि त्यावरील नाजूक सजावट अशी भुरळ पाडणारी गुढी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. सुकलेल्या लाकडापासून तयार केलेल्या छोट्याशा गुढ्या बाजारात उपलब्ध आहेत. सर्वात लहान ६० रुपयांची तर सर्वात मोठी ३०० ते ३५० रुपयांपर्यंतची गुढी आहे. गुढीसाठी विविध प्रकारचे कापड बाजारात नव्याने दाखल झाले आहेत. खणाचे कापड आणि पैठणी महिलांना आकर्षित करत आहे. २०,२८, आणि ३६ इंच अशा स्वरूपातील कापड लहान-मोठ्या गुढीसाठी उपलब्ध आहेत. त्यांची किंमत २०० ते ४०० रुपयांपर्यंत आहे. मागणीत झाली वाढ पूर्वीच्या तुलनेत गेल्या दोन वर्षांपासून रेडिमेड गुढीला मागणी वाढली आहे. मागच्या वर्षाच्या तुलनेने ही मागणी २० टक्के जास्त आहे. लहान गुढी देवा जवळ ठेवता येत असल्याने तिला मागणी आहे. -संजय पाटील, विक्रेता. पारंपरिक गुढ्यांचे यंदाही ठरणार आहे आकर्षण पारंपरिक सजावट केलेल्या नावीन्यपूर्ण रंगीबेरंगी रेडिमेड गुढी विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

साहित्याची खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी शहरातील बाजारात दिसून येत आहे. यात मोची गल्ली, जवाहर गेट, अंबा मंदिर परिसर, राजापेठ, नवाथे, राजकमल चौक, इतवारा लहान, पण दिसायला सुंदर असलेल्या रेडिमेड गुढीला ग्राहकांची अधिक पसंती आहे. खणाचे कापड, सोनेरी लेस आणि सोनेरी गोंड्यांनी गुढीचे वस्त्र सजवले आहे.

# आठवडाभरात पारा ३७ अंशावर भाजीपाला, फळबागांना चटका



**बुलडाणा :** गेल्या आठ दिवसांपासून तापमान ३७ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक आहे. त्याचा परिणाम फळबागा व भाजीपाल्यावर होत आहे. उत्पादनात घट होत असल्याने शेतकरी अडचणीत आहेत. भाजीपाला व लिंबू महाग होणार आहेत. उष्णतेमुळे पिकांचे नुकसान कमी करण्यासाठी किंवा टाळण्यासाठी उपाययोजना करणे शेतकऱ्यांना आवश्यक आहे. बुलडाणा जिल्ह्यात फेब्रुवारी महिन्यापासूनच वातावरणात बदल होत आहे. त्यामुळे आजारपणात वाढ झाली होती. सध्या व्हायरल कमी झाले असले तरी पिकांवर संकट येऊ घातले आहे. गहू काढण्यात आला असला तरी कांदा अजून बाकी आहे. फळबागा व भाजीपाला सध्या लागवड केलेले आहेत. यात प्रामुख्याने वांग्याचा समावेश आहे. लग्न सराईचे दिवस येत असल्याने वांग्याची मागणी अधिक असते. मात्र या वांग्यावर उष्णतेचा परिणाम होत असून चवही लागत नाही. ऊन्हाचा भाज्यांना फटका बसत आहे.

# रेडी रेकनर दरात १० टक्क्यांनी होणार वाढ

## रियल इस्टेट क्षेत्रात गुंतवणूकदारही अडचणीत

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा , दि. २९ : बुलडाणा शासनाच्या वतीने रेडीरेकनर दरात आता पुन्हा १० टक्क्यांनी वाढ करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे मध्यमवर्गीयांचे घराचे स्वप्न अधुरे राहणार की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे रियल इस्टेट मध्ये गुंतवणूक करणाऱ्यांनाही या दरवाढीचा झटका बसणार आहे.

बुलडाणा हा मागासलेला जिल्हा समजला जातो. तरीही बुलडाणा शहरात प्लाटींगचे भाव व घराचे भाव गगणाला भिडले असल्याचे चित्र गेल्या काही वर्षांपासून दिसत आहे. शहरातील विष्णूवाडी, चैतन्यवाडी, रामनगर, केशव नगर, एकता नगर, राजमाता जिजाऊ नगर, क्रीडा संकुल परिसर, जांभरुण रोड येथील जमिनीचे भाव गगणाला भिडले आहेत. तर जिल्ह्यातील मलकापूर, शेगाव, मेहकर, चिखली, देऊळगावराजा, खामगाव या तालुक्यांतील जमिनीचे भाव ही वेगाने वाढत आहेत.

केवळ बुलडाणा सारख्या शहरात महिन्याकाठी तब्बल सुमारे घर खरेदी-विक्रीचे व्यवहार पार पाडले जातात. या एका महिन्याच्या व्यवहारातून बुलडाणा शहरातर्फे शासनाला महिन्याकाठी तब्बल अडीच कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. उर्वरित तालुक्यांची आकडेवारी वेगवेगळी आहे. जिल्ह्यात खरेदी विक्रीची परिस्थिती अशी असताना शासनाच्या वतीने नव्या वर्षात रेडीरेकनरचा दर१० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे शासनाच्या महसुलात कर, स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन शुल्क स्वरुपात मिळणाऱ्या महसुलात वाढ तर होणार आहे. परंतु मध्यमवर्गीयांच्या आवाक्यात असलेला प्लॉट व घराची खरेदी आता आवाक्याबाहेर जाणार आहे. मालमत्ता खरेदी करताना खरेदीदारास अधिक रकमेचा भूर्दंड होण्याची शक्यता आहे.

१ एप्रिलपासून रेडी रेकनरच्या दरात वाढ होणार असल्याने याचा परिणाम थेट खरेदी-विक्री व्यवहारावर होवू शकतो. यात तब्बल१० टक्के वाढ झाल्याने रियल इस्टेट मध्ये गुंतवणूक करण्याची इच्छा असणाऱ्यांना अधिकचा कर, स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन शुल्क या सह एजंटची फी या सर्व प्रक्रियेतून जावे लागणार आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांना याचा फटका तर बसणार आहे. रेडी रेकनर दरात १० टक्के वाढ होणार आहे, या संदर्भात मार्च अखेरीस सार्वजनिक सुटीच्या तीन दिवस कार्यालय चालू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु दर वाढी संदर्भात सविस्तर आदेश मिळाल्यावरच किती वाढ होईल? याचे चित्र स्पष्ट होणार आहे. सागर पवार, सहदुय्यम निबंधक वर्ग दोन अधिकारी, बुलडाणा. २४,३०, व ३१ रोजी राहणार कार्यालय सुरु मार्च महिन्याच्या अखेरीस यंदा तीन सार्वजनिक सुट्या आल्याने नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी शासनाच्या वतीने राज्यभरातील दुय्यम निबंधक कार्यालय सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. वैनगंगा-नळगंगाप्रकल्पाने वाढवला भाव केंद्र व राज्य शासनाच्या वतीने जिल्ह्यात वैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. हा प्रकल्प जिल्ह्यातील मोताळा, मलकापूर, नांदुरा, शेगाव या मार्गाने होणार असून यामुळे या भागातील लाखो शेतकऱ्यांना सिंचनाची सोय होणार आहे. परिणामी आतापासूनच या भागातील शेतीचेही भाव हे गगणाला भिडले आहेत.

# वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन

## अपुरी पार्किंग, अनधिकृतरीत्या फेरीवाल्यांचा त्रास

**अकोला:** वाहनांच्या वाढत्या संख्येच्या तुलनेत अकोला शहरात वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. मुख्य रस्त्यांवरील अपुरी पार्किंग व्यवस्था, वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे. शहरातील अनेक चौकात सिग्नल व्यवस्था आहे. मात्र अनेकदा ते बंद असतात. तर वाशीम बायपास सारख्या मोठ्या चौकात सिग्नल नाहीत. रविवारी ऑटोचा धक्का लागल्याच्या कारणावरून हत्याकांड घडले. त्यात एका युवकाचा जीव गेला. गांधी रोड हा शहरातील प्रमुख वर्दळीचा मार्ग असून येथे नेहमीच वाहनांची मोठी गर्दी असते. अपुरी पार्किंग व्यवस्था आणि अनधिकृतरीत्या रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांमुळे वाहतुकीची कोंडी होते. परिणामी, पादचाऱ्यांना चालताना अडचणी येतात. शहरातील मुख्य बाजारपेठेत वनवे रस्ता असतानाही वाहनचालक त्याचे पालन करत नाहीत.

# आमदार अण्णासाहेब पाटील यांना मराठा महासंघाच्या वतीने अभिवादन



**अकोला:** अकोला अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखा अकोलाच्यावतीने जिल्हा कार्यालयात मराठा महासंघाचे संस्थापक कै. आमदार अण्णासाहेब साहेब पाटील यांना अभिवादन करण्यात आले . कार्यक्रमाचे सुरुवातीला मराठा महासंघाचे विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष राम मुळे, जिल्हाध्यक्ष सुरेश ठाकरे, महिला जिल्हाध्यक्ष सुनीता ताथोड यांच्याहस्ते अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनी अण्णा साहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांनी मराठा महासंघाची स्थापना केल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात झंजावात निर्माण केला व मराठ्यांची बलाढ्य संघटना उभी केली. कामगारांना त्यांचे हक्क मिळवून देऊन त्यांच्या शाळा निर्माण केल्या. कामगारांचे जीवनमान उंचविण्याकरिता अनेक योजना राबवल्या, अशी भावना अतिथींनी व्यक्त केल्या. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष सुरेश ठाकरे ,महिला जिल्हाध्यक्ष, सुनीताताई ताथोड ,भुजंगराव देशमुख यांनी अण्णासाहेब पाटील यांच्या कार्याविषयी माहिती विशद केली. कार्यक्रमाला महासंघाचे जिल्हा सरचिटणीस ॲड. अमोल सूर्यवंशी, युवक कार्याध्यक्ष आदेश अंधारे, महिला अध्यक्ष अलका देशमुख, सविता शेळके, सुनीता देशमुख, ज्योती भांबेरे, ॲड. प्रवीण महल्ले, दिलीप देशमुख, डॉ. शशिकांत पवार, विनायकराव गायकवाड आदी होते.

# शहरातील गुंड प्रवृत्तीचे २ सराईत आरोपी हद्दपार

■अकोला,दि २९ (प्रतिनिधी):
अकोला शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये तसेच विवीध प्रकारचे वारंवार गुन्हे करणा-या ईसमांवर कायदयाचे धाक रहावे याकरीता पोलीस अधीक्षक श्री. बच्चनसिंह साहेब, अपर पोलीस अधिक्षक श्री. अभय डोंगरे साहेब यांचे मार्गदर्शनामध्ये प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणुन पो.स्टे. खदान. हद्दीतील १) प्रशिक राजेश जावळे वय २३ वर्ष रा. जेतवन नगर धोबी खदान, अकोला, २) अक्रम बेग ईमाम बेग वय ३३ वर्ष रा. ईस्लाम चौक, झिराबावडी, खदान, अकोला या आरोपीं विरूध्द दाखल गुन्हयांचे स्वरूप पाहता त्यांचे विरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ अन्वये अकोला जिल्हयातुन हद्दपार करण्या बाबत प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी, अकोला यांचे कडे सादर करण्यात आला होता.

त्यानुसार उपविभागीय दंडाधिकारी, अकोला यांचे आदेशान्वये उपरोक्त वर नमुद ०२ गुन्हेगारी प्रवृत्तीच्या ईसमांना अकोला व बाळापुर तालुक्यातुन सहा महिण्याकरीता हयार करण्यात आले आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. बच्चनसिंह साहेब यांनी अकोला आगामी सण-उत्सव काळात जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहुन शांतता रहावी या करीता अश्या प्रकारचे गुन्हे करणारे व कारवाईस न जुमानणा-या सराईत गुन्हेगारी प्रवृत्तीचे ईसमांची माहिती संकलीत करण्याचे आदेश दिले असुन त्यांचे विरूध्द वरील प्रमाणे प्रभावी प्रतिबंधक कारवाई करणे सुरू आहे.

# कृषि पदवीधरांनी रक्तदानातून जोपासली सामाजिक बांधिलकी!

## तब्बल ५०३ युनिट रक्तसंचय करीत रुग्णसेवेचा जपला वसा!

### राष्ट्रीय सेवा योजना डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोलाचा महत्वपूर्ण उपक्रम!

■अकोला,दि २९ (प्रतिनिधी):
कृषी शिक्षणात अग्रेसर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कार्यक्षेत्र संपूर्ण विदर्भ असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयीन शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या तरुणाईला सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देण्यात येते. विद्यार्थी कल्याण विभागाचे अंतर्गत विदर्भातील सर्वच कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यान्वयन होत असून गावपातळीवरील निवासी शिबिराचे माध्यमातून या माध्यमातून कृषी पदवीधरांची ग्रामीण भागाशी ना अधिक घट्ट करण्यासह इतर सामाजिक बांधिलकीचे कृतियुक्त धडे गिरविले जातात.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या ३७ महाविद्यालयांमध्ये नियमित कार्यक्रमासाठी २८०० तर विशेष शिबिरासाठी १४०० विद्यार्थी विद्यापीठाच्या सर्व महाविद्यालयांनी ७ दिवसांचे विशेष शिबिर आयोजन करणे अनिवार्य असून या शिबिरादरम्यान रक्तदान शिबिरेही आयोजित करण्यात आली.





**रक्तदानाचे फायदे:** १ प्राणवाचक दान २ आरोग्यासाठी उपयुक्त ३ हृदयाचे आरोग्य ४ मानसिक समाधान डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठा अंतर्गत घेण्यात आलेली प्रमुख रक्तदान शिबिरे आणि संकलन १) समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगाव राजा - ग्राम खळ्याल गव्हाण येथे आयोजित शिबिरात २२ युनिट रक्तदान झाले. २) कृषी महाविद्यालय, अकोला - ग्राम सिसा मासा येथे विशेष शिबिरात २२ बॉटल रक्तदान झाले. ३) कृषी महाविद्यालय, रिसोड - ग्राम सवड येथे रक्तदान शिबिरात ३० बॉटल रक्तदान झाले. ४) कृषी महाविद्यालय, पिंपळखुटा - ग्राम शिदोडी येथे आयोजित शिबिरात ५५ रक्त बाटल्यांचे संकलन करण्यात आले. ५) कृषी महाविद्यालय, पिंपरी (वर्धा) - ग्राम बिवापूर येथे १३ बॉटल रक्तदान झाले. ६. श्री. शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, अमरावती - ग्राम ब्राह्मणवाडा भगत येथे ९ बॉटल रक्तदान झाले. ७. कृषी महाविद्यालय, चामोर्शी (तालुका) - ग्राम बिवापूर येथे २० बॉटल रक्तदान झाले. ८. कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, अकोला - ग्राम परांडा येथे ३५ बॉटल रक्तदान झाले. ९. पी. आर. पोटे कृषी महाविद्यालय, अमरावती - ग्राम रेवासा येथे १७ बॉटल रक्तदान झाले. १०. कृषी महाविद्यालय, दारव्हा - ग्राम भुलाई येथे ३८ बॉटल रक्तदान झाले.

११. कृषी महाविद्यालय, हिराटोला- ग्राम गोरेगाव येथे १५ बॉटल रक्तदान झाले. १२. श्री. शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावती - ग्राम दारापूर येथे ३६ बॉटल रक्तदान झाले.

**रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असून रक्तदानामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचतात. अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण, प्रसूतीतील माता, तसेच कर्करोग आणि थॅलेसेमिया रुग्णांना वेळेवर रक्त मिळणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत रक्तदात्यांच्या मदतीमुळे त्यांचा जीव वाचतो. रक्तदान हे केवळ एक सामाजिक कर्तव्य नसून ते मानवी जीवन वाचविण्याचे पवित्र कार्य आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी संस्कृतीने पाचशेहून अधिक युनिट रक्त संकलन करून समाजाला चांगला संदेश दिला आहे. प्रत्येकाने दर तीन महिन्यांनी रक्तदान करून समाजातील गरजू रुग्णांना जीवनदान देण्यासाठी पुढाकार घ्यावा.**

# डॉ.मानधने बंधुंच्या विरोधात अवैध सावकारीचा गुन्हा

■अकोला,दि २९ (प्रतिनिधी):
मलकापूरतील ओमप्रकाश मंत्री यांच्या तक्रारीवरून नवल द्वारकादास मानधने व पवन द्वारकादास मानधने रा. मानधने हॉस्पीटल, स्केटिंग ग्राउंडच्या समोर,गोरक्षण रोड, ता जि.अकोला यांच्याविरुद्ध खदान पोलिस ठाण्यात 'अवैध सावकारी'चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा उपनिबंधक सहकारी सहकारी संस्था अकोला यांचेकडे ओमप्रकाश मंत्री यांनी केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने सदर प्रकरणांत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ कलम १६ अन्वये उपनिबंधक सहकारी सस्था,अकोला यांचेकडून पथक गठीत करण्यात आली होती. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे आदेशाने डॉ. नवल द्वारकादास मानधने व पवन द्वारकादास मानधने यांचे गोरक्षण रोडवरील दुकानात व निवासस्थानी झाडाझडतीची कार्यवाही करीत कागदपत्रांचा शोध घेण्याची कार्यवाही करण्यात आली होती. या झडतीदरम्यान अवैध सावकारी सिद्ध करणारी बरीच कागदपत्रे आढळून आल्याने त्याची चौकशी करण्यात आली. उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांनी प्रकरणातील गैर अर्जदारांना नोटीस देऊन आपले म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी देऊन त्यानुसार सदर प्रकरणाची चौकशी केली. सदरची चौकशी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ में कलम १६ अन्वये करण्यात आली असता प्राप्त अहवालानुसार अर्जदार व गैरअर्जदार यांचेमधील व्यवहार हा सावकारी व्यवहार असल्याबाबत अभिप्राय देण्यात आला असून सदर प्रकरणातील डॉ. नवल द्वारकादास मानधने, पवन द्वारकादास मानधने, दोघेही रा. मानधने हॉस्पीटल, स्केटींग ग्राऊंड गोरक्षण संस्थान समोर, गोरक्षण रोड अकोला यांच्याविरुध्द महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम ३९ अन्वये अकोल्यातील खदान पोलिस स्टेशन येते गुन्हा दाखल झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

# पाय घसरून पडल्याने ३३ वर्षीय जखमी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

■तेल्हारा,दि २९ (प्रतिनिधी):
तेल्हारा तालुक्यातील बेलखेड येथील रहिवाशी संतोष काशीराम इंगळे वय ३३ वर्षे नामक इसमाचा पाय घसरून पडल्याने जखमी होऊन उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना दिनांक २५ मार्च २०२५ रोजी घडली असून याप्रकरणी तेल्हारा पोलिसात दि.२९ मार्च रोजी पहाटे ३.४३ वाजेदरम्यान अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.तेल्हारा तालुक्यातील बेलखेड येथील रहिवाशी संतोष काशीराम इंगळे नामक इसम दिनांक २३ मार्च २०२५ रोजी सकाळी सव्वादहा वाजे दरम्यान तेल्हारा पोस्टे हद्दीतील पाथर्डी येथील भोलेनाथ चौकातील डॉ राजेंद्र वासी यांच्या दवाखान्यात गेला असता तेथील पायऱ्यावरून चक्कर येऊन पडल्याने डोक्याला मार लागून जखमी झाल्याने प्रथम उपचार कामी सरकारी दवाखाना नेर नागपूर मेडिकल ट्रामा येथे भरती केले असता त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना दिनांक २५ मार्च २०२५ रोजी रात्री दोन बाजे दरम्यान घडली. फिर्यादी हेडकॉन्स्टेबल मधुकर यांच्या फिर्यादीवरून तेल्हारा पोलीस स्टेशनमध्ये मर्ग क्रमांक ८/२०२५ कलम १९४( बी एन एस एस) नुसार अकस्मात मृत्यूची (अनैसर्गिक मृत्यू) नोंद करण्यात आली आहे.

# आगामी रमजान ईद व रामनवमीच्या पार्श्वभूमीवर अडगांव बु येथे रुट मार्च



■अडगांव,दि २९ (प्रतिनिधी):
तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येत असेलअडगांव बु येथील आगामी रमजान ईद आणि रामनवमीच्या पार्श्वभूमीवर शांतता आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाच्या वतीने दिनांक २८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी साडेपाच ते सातच्या वेळेत विशेष रुट मार्च काढण्यात आली या रुट मार्चमध्ये हिवरखेड पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी स्थानिक प्रशासन होम गार्ड आणि विविध समाजातील नागरिकांनी सहभाग घेतला हा मार्च अडगांव बु येथील प्रमुख मार्गावरून काढण्यात आला आडगाव पोलीस चौकी पासून सुरुवात केली घाणा चौक ,गांधी चौक, राम मंदिर ,मानकर पुरा ,गजानन नगर,काळा मारुती मंदिर ,कुरेशीपुर , आणि या मार्गाचा समावेश होता रुट मार्च दरम्यान पोलीस अधिकाऱ्यांनी स्थानिक नागरिकांची संवाद साधून त्यांना शांतता व भेदभाव टिकवून ठेवण्याचे आव्हान केले तसेच कोणतेही प्रकारच्या अफवा किंवा गैर प्रकारापासून सावधान राहण्याची सल्ला दिली पोलीस प्रशासन स्थानिक नेत्यांसोबत चर्चा करून आगामी सण उत्साहाने पण शांततेने साजरा करण्याचा आव्हान केले.

असून पोलिस प्रशासनाने घेतलेल्या या उपययोजनांचे कौतुक होत आहे रमजान ईद आणि रामनवमी दोन्ही सण धार्मिक आणि सामाजिक दृष्टीने महत्त्वाचे असल्यामुळे या काळात विशेष दक्षता घेणे आवश्यक असते त्यामुळे प्रशासनाने आधीच योग्य ते उपयोजना राबून नागरिकांचा विश्वास

# विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देणारे शिक्षण काळाची गरज : प्रा. राजेश पाटिल ताले



■अकोला,दि २९ (प्रतिनिधी):
पीएम श्री म.न.पा.उच्च प्राथमिक व माध्यमिक मराठी शाळा क्र.२६,विरभगतसिंग नगर अकोला येथे आज पीएम श्री अंतर्गत विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायझेशन चे अध्यक्ष,राष्ट्रीय व्याख्याते प्रा.राजेश पाटिल ताले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांसोबत संवाद साधणे नेहमीच प्रेरणादायी असते तसेच शाळेतील शिक्षणाच्या विविध उपक्रमांची माहिती घेणे हेही महत्वाचे असते.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आज या शाळेतील विद्यार्थ्यांसोबत अतिशय सुंदर संवाद साधता आला.शाळेचे मुख्याध्यापक अवधूत सर,देशपांडे सर तसेच सर्व शिक्षकवर्ग यांनी शाळेमार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली.शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास आणि आजच्या कॉन्व्हेंटच्या काळातदेखील या मनपा शाळेतील विद्यार्थीसंख्या लक्षणीय आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि विद्यार्थ्यांचा विकास साधणे हे मोठे आव्हान आहे.

## थोडक्यात

### झोटिंग बाबा यात्रा महोत्सव गुढिपाडव्याला



**अकोट:** तालुक्यातील रंभापूर येथील बालयोगी संत झोटींग बाबाचा यात्रा महोत्सव ३० मार्च रोजी होत आहे. मंदिरात पहाटे ५ वा. महापूजा होणार असून नंतर ९ वा. पालखी प्रदक्षिणा गावातून निघणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वा. पासून महाप्रसादला सुरुवात होणार आहे.

लगतच्या राज्यातून मोठ्या प्रमाणावर भाविक दर्शनाला येण्याची शक्यता व आहे. गेल्यावर्षी ३० ते ३५ हजार भाविकांनी दर्शन घेतले. यावर्षी वाढ होण्याची शक्यता संस्थान कडून वर्तवण्यात येत आहे. भाविक भक्तांच्या पिण्याच्या पाण्याची कायम स्वरुपी व्यवस्था मंदिर परिसरात आहे. तसेच चार ते पाच पिण्याच्या पाण्याची टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. भंडारा दूर शेतामधे जेथे कुठे असेल तेथे त्यांना जाग्यावर पिण्याचे पाणी मिळणार आहे. गावामधे कुणालाही पाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही. तसेच जाण्यायेण्याच्या सोयीसाठी अकोट रंभापूर जादा यात्रा बसेसची व्यवस्था अकोट आगारातून करण्यात आली आहे. त्याव्यतीरीक्त रंभापूर फाट्यावर सुद्धा बस थांबणार आहेत, शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अकोट ग्रामीण पोलिस स्टेशनचा स्टाफ, त्यामधे अंमलदार, पोलिस, लेडीज पोलिस, स्त्री पुरुष होमगार्ड, वाहतूक पोलिस यांचा समावेश पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनात असणार आहे. मंदिराच्या सभामंडपात आणि बाहेर सिसीटीव्हीची नजर असणार आहे. पोलिसांच्या मदतीला गट ग्रामपंचायत सावरा रंभापूरचे सरपंच, उपसरपंच, सदस्य ग्रामपंचायत अधिकारी, गावचे पोलिस पाटील, सावरा भागाचे ग्राम महसुल अधिकारी, विज वितरण कंपणीचे अभियंता, तसेच त्यांचे कर्मचारी, झोटींग बाबा संस्थानचे अध्यक्ष,स.पूर्ण विश्वस्त, आणि रंभापूर येथील ग्रामस्थ यात्रेवर नियंत्रण ठेवून असणार आहेत.

# पंचायत समिती मधील पे पार्किंग बंद करा



■अकोला,दि २९ (प्रतिनिधी):
पंचायत समिती कार्यालय आवारात काही दिवसापासून पे पार्किंग सुरू करण्यात आले असल्याचे वंचित बहुजन युवा आघाडी यांचे निदर्शनास येताच युवा आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी अप्पर जिल्हा परिषद सीईओ यांची भेट घेत पार्किंगची कल्पना करून दिली.

सर्व सामान्य नागरीका कडून पार्किंग शुल्क ०५ रूते २५ रू पर्यंत आकारले जात आहे, पंचायत समिती कार्यालयात सर्व कार्यालय हे सार्वजनिक कार्यालये आहेत.

घरकुल विभाग, पंचायत विभाग, ग्रामसेवक यांच्या भेटीकरिता व आपली समस्या अथवा माहिती घेण्याकरिता येत असतात, जर नागरिकांच्या हक्काचे सार्वजनिक कार्यालय असताना येथील गटविकास अधिकारी तेवढ्यासाठी १० रुपये सर्वसामान्यनागरिकाकडून पार्किंग चे पैसे उकळताना दिसत आहेत या विषयी पार्किंग शुल्क कोणत्या आधारावर घेत आहात.

पे पार्किंग चे आदेश आहेत का असेल तर आदेशची प्रत , हा पार्किंगचा ठेका कोणत्या कंत्राटदाराला व कोणत्या आधारावर दिला? याचा जाब सी ई ओ यांना युवा आघाडीच्या पदाधिकारी यांनी विचारला जर यावरही पे पार्किंग बंद करण्यात आली नाही तर वंचित बहुजन युवक आघाडी अकोला तालुक्याच्या वतीने ही पार्किंग बंद करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी अकोला तालुका अध्यक्ष मिलिंद दामोदर. प्रसिध्दी प्रमुख आकाश जंजाळ रोशन डोंगरे भूषण वानखडे योगेश तायडे स्वप्निल सोळंके नागेश उमाळे विजय वानखडे सोनू सोळंके अक्षय गवई वैभव उमाळे यासह कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हुतात्मा चौक ते गोरक्षण रोडवरील अतिक्रमण हटवले

अकोला: वाढते अतिक्रमण ही शहरासाठी समस्या झाली आहे.

शहरातील विविध भाग अतिक्रमण मुक्त करण्यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्न करते परंतु त्याला मर्यादा येतात. शुक्रवारी सकाळ पासून हुतात्मा चौक ते गोरक्षण रोडवरील अतिक्रमण काढले वाढत्या बेरोजगारीला पर्याय म्हणून स्वयंरोजगार केला जातो. शहरात लहान सहान व्यवसाय करून रोजी रोटी कमावतात परंतु त्यासाठी अतिक्रमण करण्याची गरज आहे का हा प्रश्न आहे. महापालिका पर्यायी जागा उपलब्ध करून देते परंतु अतिक्रमण करूनच व्यवसाय करणा?यांवर कारवाई केली जात आहे. अतिक्रमण ही मोठी समस्या होऊन बसली आहे. काही भागात तर पायी चालणे कठीण होते पण विक्रेते मोठ्याने ओरडून विक्री करतात. ही जागा आपल्या मालकीची असल्याप्रमाणे त्यांचा व्यवहार दिसतो.

# हेमंत गावंडे यांच्या मारेकऱ्यांना फाशी झालीच पाहिजे

## निर्घृण हत्येच्या निषेधार्थ नागरिकांचा विशाल मूक मोर्चा व कँडल मार्च



**हिवरखेड** : हिवरखेड येथील हेमंत उमेश गावंडे हे दि. १६-३-२०२५ रोजी पत्नी हर्षा व आपल्या अडीच वर्षीय मुलासोबत रेल्वेने आकोट वरून अकोला गेले असता अकोला रेल्वे स्टेशनवर रेल्वे थांबली असता रवी परमार या परप्रांतीय सराईत, अट्टल गुन्हेगाराने हेमंत यांच्या पत्नीच्या गळ्यातील सोन्याची पोथ तोडून पळ काढला. स्व. हेमंत यांनी चोराला पकडण्यासाठी चोराचा पाठलाग केला. पण रात्रीच्या अंधारात तेथील झुडपात रवी परमार या बदमाशाने स्व. हेमंत गावंडे यांच्यावर हल्ला चढविला व त्यांच्या डोक्यावर व चेहऱ्यावर दगडाने प्रहार करून त्यांचा निर्घृण खून केला. पोलिसांनी या चोरट्याला अटक केले असले तरी या खूना संदर्भात भव्य मूक मोर्चा व कँडल मार्च काढून सर्वसामान्य शेकडो हिवरखेड वासियांनी या खुणा संदर्भात अनेक मागण्या केल्या आहेत.

नागरिकांच्या प्रमुख मागण्या.

१) हा खून खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवल्या जावा, याकरिता गावंडे कुटुंबाला चांगला नामांकित सरकारी वकील उपलब्ध करून द्यावा व हल्लेखोराला फाशीची शिक्षा देण्यात यावी जेणेकरून गुन्हेगारीवर वचक बसेल.

# अकोला पोलीस दलातील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी अंमलदार यांचा सत्कार सोहळा संपन्न

■अकोला,दि २९ (प्रतिनिधी):
दिनांक २९/०३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा मा. श्री बच्चन सिंह पोलीस अधीक्षक, अकोला यांच्या मार्गदर्शना खाली, पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला येथील 'विजय हॉल' येथे सेवानिवृत्त पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. माहे मार्च २०२५ अखेरीस अकोला पोलीस घटकातील ०१) पोलीस निरीक्षक श्री. सुनिल वायदंडे, ०२) श्रेणी पोउपनि श्री. जयवंत शिंदे, ०३) श्रेणी पोउपनि श्री. शिवलाल निखाडे, ०४) श्रेणी पोउपनि श्री. संतोष पंचाभाई, ०५ ) सपोउपनि श्री. संजय टेकाडे, ०६) सपोउपनि श्री गणेश ठाकुर व ०७) पोहवा श्री. राजकुमार गणविर हे सेवानिवृत्त होत आहेत.सदर सत्कार सोहळा कुटुंबियांच्या उपस्थितीत असल्याने पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या मध्ये आनंदाचे वातावरण होते. पोलीस कुटुंबीयांनी तसेच सेवानिवृत्त होणारे सत्कारमुती यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना आनंद व्यक्त केला. त्यांनी नोकरीतील केलेले कर्तव्या बाबत समाधान व्यक्त केले, तसेच पोलीस प्रशासनाकडुन अशा प्रकारचा सत्कार सोहळा आयोजीत केल्या बद्दल आभार व्यक्त केले.



त्यानंतर पोलीस अधीक्षक साहेब यांनी सेवानिवृत्त होणा-या अधिकारी व अंमलदारांच्या परीवाराबाबत आस्थेने विचारपुस केली. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी / अंमलदार यांना आपले आरोग्य संभाळण्याचा महत्वाचा सल्ला दिला. तसेच आपले छंद जोपासून, परिवाराला वेळ देण्याबाबत मार्गदर्शन केले. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी अंमलदार यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.सदर चा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता राखीव पोलीस निरीक्षक श्री गणेश जुमनाके व पथक यांनी मेहनत घेतली तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व सुत्र संचालन परी. पोलीस उपनिरीक्षक श्री. बाळु पवार यांनी केले.

# न्यायव्यवस्थेत अखेर चाललयं तरी काय?

**देशभरात महिलासंबंधी अत्याचार आणि गुन्हेगारीच्या प्रकरणांनी कळस गाठला आहे. दररोज अंगावर शहारे आणणारे प्रकार उघडकीस येत असतानाच अलीकडे ११ वर्षांच्या मुलीशी संबंधीत एका खटल्याचा निकाल देताना न्यायालयाने म्हटले आहे की, महिलेचे वक्ष आणि तिच्या पायजम्याचा कमरबंद पकडणे बलात्काराच्या प्रयत्नाच्या कक्षेत येत नाही. तथापि, न्यायालयाने याला गंभीर लैंगिक छळ मानला आहे. यामुळे अलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निर्णय सध्या चर्चेचा विषय बनला आहे.**

------------

अलाबाबाद उच्च न्यायालयाने अलीकडेच एका महत्त्वाच्या निर्णयात असे काही म्हटले आहे जे प्रश्नांकित आहे. कासगंजच्या पटियाला पोलीस स्टेशन परिसरातील हा निर्णय आहे. ११ वर्षाच्या मुलीसोबत लैंगिक शोषणात सहभागी असल्याचा आरोप पवन आणि आकाश या दोघांवर आहे.

या दोघांनी मुलीच्या पायजम्याचा कमरबंद तोडून तिला कल्व्हर्टखाली ओढण्याचा प्रयत्न केला. या खटल्याचा निकाल देताना न्यायालयाने म्हटले आहे की, महिलेचे स्तन आणि पायजम्याचा कमरबंद पकडणे बलात्काराच्या प्रयत्नाच्या कक्षेत येत नाही. तथापि, न्यायालयाने याला गंभीर लैंगिक छळ म्हटले आहे.

११ वर्षाच्या मुलीसोबत घडलेल्या घटनेच्या सुणावणीदरम्यान न्यायालयाने हा निकाल दिला आणि आरोपींना निर्दोष सोडण्याचे आदेश दिले. तत्पूर्वी, आरोपींनी अर्ज दाखल केला होता की, त्यांना बलात्काराच्या प्रयत्नासाठी आणि पोक्सो कायद्यांतर्गत समन्स बजावण्यात आला आहे, जे चुकीचे आहे आणि त्यात सुधारणा करण्यात यावी. या प्रकरणात, उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला पोक्सो कायद्याच्या कलम २ अंतर्गत समन्समध्ये बदल करून ते जारी करण्याचे निर्देश दिले.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या या वादग्रस्त निर्णयावर देशभरातून पडसाद उमटू लागले आहे. केंद्रीय महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी टीका करत निषेध नोंदविला. अशा निर्णयामुळे समाजात चुकीचा संदेश जाईल. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात लक्ष घालण्याची त्यांनी विनंती केली.

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राम मनोहर नारायण मिश्रा यांनी दोन व्यक्तींच्या बाजूने निकाल दिला. बलात्काराच्या आरोपाखाली त्यांना समन्स बजावण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आवाहन देण्यात आले होते.

जेष्ठ आणि वरिष्ठ वकील शोभा गुप्ता यांनी सरन्यायाधीशांना पत्र लिहून या प्रकरणाची स्वतःहून दखल घेण्याची विनंती केली. शोभा गुप्ता यांनी स्वतःच्या आणि 'वी द वुमन ऑफ इंडिया' या संघटनेच्या वतीने सरन्यायाधीशांना पत्र लिहिले.

या आदेशामुळे कायद्याबद्दलची त्यांची समजुतदारपणा हादळली आहे. बातम्यांचे वृत्त पाहिल्यानंतर ते खूप अस्वस्थ झाले आहेत. प्रशासकीय आणि न्यायलयीन दोन्ही बाजूंनी या प्रकरणाची स्वतःहून दखल घेण्याची विनंती सरन्यायाधीशांना करण्यात आली.

शोभा गुप्ता यांनी त्यांच्या पत्रात लिहिले आहे की, न्यायाधीशांचे हे स्पष्टीकरण पूर्णपणे चुकीचे आहे नि या विषयावरील त्यांचे विचार असंवेदनशील आणि बेजबाबदार आहेत. यामुळे समाजात एक चुकीचा संदेश जातो, जिथे महिलांवरील वाढत्या लैंगिक गुन्ह्यांमुळे आधीच एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

तिने लिहिले की, ती सर्वोच्च न्यायालयात प्रॅक्टिस करणारी एक वरिष्ठ वकील, एक महिला आणि 'वी द वुमन ऑफ इंडिया' या संस्थेच्या वतीने दुःखद आणि चिंतेने हे पत्र लिहित आहे. याच निर्णयावर बोलताना आप खासदार स्वाती मालीवाल यांनीही हा निर्णय दुर्दैवी नि खूप लज्जास्पद असल्याचे म्हटले.

**शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ.**
**७०५७१८५४७९**

संबंधित प्रकरणातील आरोपींनी केलेले कृत्य बलात्काराच्या श्रेणीत का येत नाही? या निर्णयामागील तर्क न समजण्यासारखे आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढत एक स्वागतार्ह पाउल उचलत त्याला स्थगिती दिली. आमदार चित्रा वाघ यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे माझ्यासह प्रत्येक स्त्रीला प्रचंड वाईट वाटले, मनाला क्लेश झाला असे म्हटले. या निर्णयाविरुध्द देशभरात संतापाची लाट आपल्याला पाहायला मिळाली होती. सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या भूमिकेमुळे आलेलं मळभ दूर झालं हे नक्की असे म्हणत चित्रा वाघ यांनी सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानले आहेत.

तसेच डॉ. भारती लवेकर यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या वादग्रस्त निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेत महिलांच्या हक्काचे, आत्मसन्मानाचे व सुरक्षिततेचे संरक्षण केल्याचे म्हटले आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेला निकाल मनाला क्लेश देणारा होता. या निर्णयाबद्दल आम्हा भगिनींना प्रचंड मनस्ताप झाला, देशभर संतापाची लाट उसळली. सर्वोच्च न्यायालयाने कठोर ताशेरे ओढले व हा निकाल रद्द केला. यामुळे आम्हा भगिनींच्या मनामध्ये असुरक्षिततेचे वादळ निर्माण झाले होते ते दूर झाले.

दुसरीकडे दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधिश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी होळीच्या दिवशी झालेल्या अग्निकांडात करोडो रुपयांच्या रोख रकमेचे घबाड सापडले. यानंतर संपूर्ण न्यायालयीन वतुर्ळात भूकंप झाला. या भुकंपाचे धक्के अगदी संसदेपर्यंत पोहचले.

त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे कॉलेजियमने त्यांच्या विरोधात प्राथमिक चोकशी सुरु केली व त्यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याचा निर्णय घेतला. होळीच्या दिवशी न्यायाधीश वर्मा यांच्या निवासस्थानी आग लागल्यानंतर कुटुंबीयांनी अग्निशमन दल आणि पोलिसांना प्राचारण केले.

आग विझवल्यानंतर मात्र पोलिसांना एका खोलीत करोडो रुपयांचे घबाड सापडल्याचे वृत्त पुढे येताच न्यायव्यवस्थेत एकच खडबड उडाली. यावर सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमकडून सावरासावर करण्यात येऊन त्यांची पुन्हा अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानंतर अलाहाबाद उच्च न्यायालय बार असोसिएशनने या निर्णयाला तिव्र विरोध दर्शविला. न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी एवढी मोठी रोकड सापडणे म्हणजे न्यायव्यवस्थेला व समाजाला अधांतरी ठेवून एकंदरीत देशाची दिशाभूल करण्याचे काम त्यांनी केले. त्यांना कोणत्याही स्तरातून माफी नको. शिवाय वर्मा यांच्यावर भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल करावा या मागणीने जोर धरला आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल झाली आहे. मात्र, त्यांच्याविरुद्ध अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही.

आज देश कित्येक गंभीर आणि मोठ्या समस्यांना तोंड देत असतांना देशाचा जबाबदार व्यक्ती वाममार्गाने किंवा इतर मार्गाने करोडो रुपये कमवितो, तर स्त्रर्वसामान्य जनतेंनी काय करावे? असा प्रश्न उपस्थित होणे साहजिकच आहे.

वर्मा यांच्या घरी एवढा पैसा कुठून आला? यावरून त्यांनी न्यायदेवतेचा अवमान करीत चुकीच्या मार्गाने पैसा कमवित असल्याचे सिद्ध होते. म्हणजेच त्यांनी निर्दोष व निष्पाप जीवांचा बळी घेत आणि दोषींना मुक्त करीत असावे हे सत्य नाकारता येत नाही. एवढेच नाही तर इतरत्रही त्यांची अमाप स्वरुपात संपत्ती असू शकते. त्यामुळे त्यांनी कायद्याचे उल्लंघन करीत असल्याचे दिसून येत असल्याने त्यांची जागा आता न्यायालयात नसून पोलीस कोठडीत असायला पाहिजे.

सरन्यायाधीशांनी याची सखोल चौकशी करून कार्यवाही करावी. कारण देशाच्या एका जबाबदार व्यक्तीच्या घरात एवढी मोठी रोख रक्कम सापडणे ही बाब लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. ■ ■ ■

# नववर्ष स्वागतयात्रा...



गुढीपाडवा हा हिंदू नववर्षाचा पहिला दिवस आणि पहिला सण. ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मितीही याच दिवशी केली. महाराष्ट्रात या दिवसाचे स्वागत दारोदारी गुढ्या उभारून केले जाते. या दिवशी पारंपरिक वेशभूषा परिधान करून एकमेकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या जातात.

हल्लीच्या पिढीवर सामाजिक माध्यमे, इंटरनेट यांचा प्रभाव अधिक असल्याने हल्ली शुभेच्छा प्रत्यक्ष भेटून देण्याऐवजी व्हाट्सअप आणि टेलिग्रामच्या माध्यमातून दिल्या जाऊ लागल्या आहेत. मुंबई ठाणे, पुणेसह काही प्रमुख शहरांमध्ये या दिवशी नववर्ष स्वागतयात्रा काढल्या जातात. विविध सामाजिक संस्था, सांस्कृतिक मंडळे, संप्रदाय, संघटना यांचे प्रतिनिधी या स्वागतयात्रांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. विविध मंगलवाद्यांसह ढोल ताशा पथकांचे संचलन या स्वागतयात्रांचे प्रमुख आकर्षण असते. काही ठिकाणी या यात्रांमध्ये समाज प्रबोधनात्मक देखावे सादर केले जातात, पारंपरिक खेळांची आणि शौर्य जागरणाची प्रात्यक्षिके यानिमित्ताने पाहायला मिळतात. ज्वलंत सामाजिक विषयावर भाष्य करणारे प्रबोधनात्मक फलक या स्वागतयात्रांचे प्रमुख वैशिष्ट्य असते. पारंपरिक दागिन्यांसह नऊवारी साडी परिधान करून दुचाकीस्वार तरुणी या स्वागतयात्रांची शोभा वाढवतात, यात्रांच्या स्वागतार्थ यात्रामार्गावर ठिकठिकाणी रांगोळ्या काढल्या जातात, स्वागताचे फ्लेक्स लावले जातात, या स्वागतयात्रांचे अनेक ठिकाणी सवाष्ण स्त्रिया औक्षण करून स्वागत करतात तर काही ठिकाणी या स्वागतयात्रांवर पुष्पवर्षाव केला जातो.

यानिमित्ताने सर्वत्रचे वातावरण भगवामय झालेले असते. स्वागतयात्रांच्या समारोपाच्या ठिकाणी काही वेळा मान्यवरांची भाषणे होतात. गुढीपाडव्याच्या निमित्ताने काढण्यात येणाऱ्या स्वागतयात्रांमध्ये लोक आपली जात, पक्ष, संघटना विसरून एक हिंदू म्हणून सहभागी होतात. हिंदूंच्या संघटनशक्तीचे अभूतपूर्व दर्शन या स्वागतयात्रांतून घडते. खरेतर हे संघटन केवळ स्वागतयात्रांच्या निमित्ताने नव्हे तर ते कायमस्वरूपी दिसण्याची आवश्यकता आहे.

ज्या भारतभूमीत एकेकाळी सोन्याचा धूर निघत होता, प्रत्येक खेडी स्वयंपूर्ण होती त्या भारतावर आज कोट्यवधी रुपयांचे कर्ज आहे. देशावर चालून आलेल्या यवनी आक्रमकांनी, इंग्रजांनी, पोर्तुगिजांनी या देशाचे सारे वैभव लुटले, तलवारीच्या जोरावर धर्मांतरे घडवून आणली, नागरिकांवर अनन्वित अत्याचार केले.

त्याकाळी असलेले राजे महाराजे शूरवीर आणि सामर्थ्यशाली होते; मात्र नागरिक जातीपातींत विभागले होते. हिंदूंमधील याच फुटीचा लाभ इंग्रजांनी घेतला. फोडा आणि राज्य करा नीतीचा अवलंब केला. मूठभर इंग्रजांनी अवाढव्य हिंदुस्थानावर दीडशेहून अधिक वर्षे राज्य केले. जातीपातीत इंग्रजांनी निर्माण केलेली दरी स्वातंत्र्यानंतरही कायम ठेवण्याचे काम नंतरच्या राजकारणी मंडळींनी केले. आजही हे कार्य अविरतपणे सुरु आहे.

राजकीय स्वार्थासाठी हिंदूंमध्ये फूट पाडण्याचे, जातीपातीसाठी लढण्याचे ही मंडळी आपल्या भाषणांतून जणू प्रशिक्षणच देत असतात. हिंदूंमध्ये असलेल्या ऐक्याच्या अभावामुळे आज कोणीही उठतो आणि टीका करतो. देशात धर्मांतरण बंदीचा कायदा आणण्यासाठी अनेक वर्षांपासून मागणी केली जात आहे मात्र सरकार त्याकडे केवळ दुर्लक्ष करत आहे. देशभरात प्रसिद्ध असलेली जवळपास सर्वच मंदिरे आज शासनाच्या अखत्यारीत आहेत. भाविकांनी या मंदिरांना श्रद्धेने दिलेल्या दानावर आज शासनाचा अंकुश आहे. सरकार हा पैसा जलयुक्त शिवार, दुष्काळ निवारण, आंतरजातीय विवाह यांसारख्या शासकीय योजनांसाठी हवा तसा वापरते. सरकारी तिजोरीत पैसा संपल्याचे कारण देत मंदिरांच्या तिजोरीवर डल्ला मारला जातो.

हिंदूंना पूजनीय असलेल्या गाईच्या संरक्षणासाठी राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा करण्यात आला. देशात प्रथमच महाराष्ट्र राज्याने गाईला राज्यमातेचा दर्जा दिला मात्र आजही प्रतिदिन मोठ्या प्रमाणात गोवंश कापला जात आहे. गोवंशाने भरलेल्या गाड्या कुठेनाकुठे पकडल्या गेल्याच्या बातम्या प्रतिदिन वर्तमानपत्रांतून वाचायला मिळतात. मुक्त केलेल्या गोवंशांना जवळच्या गोशाळांमध्ये सोडले जाते. अशा हजारो गोशाळा आज राज्यात आहेत. सरकारी अनुदान केवळ मोजक्या गोशाळांना मिळते. अन्य गोशाळा सर्वस्वी गोप्रेमींच्या दानावर चालत आहेत.

मंदिरांत दिलेले दान सरकार गोवंश जगवण्यासाठी का वापरत नाही असा गंभीर प्रश्न गोप्रेमींना पडला आहे. अशा एकना अनेक समस्या आज हिंदूंसमोर आ वासून उभ्या आहेत. या सर्व समस्यांचे निवारण केवळ हिंदूंच्या संघटनातुन होऊ शकते.

'संघे शक्ती कलौयुगे' हा कलियुगातील मूळमंत्र आहे. संघटनेत शक्ती असते. संकटांविरोधात लढण्याचे सामर्थ्य असते त्यामुळे हिंदूंनी केवळ नववर्ष स्वागतयात्रांच्या निमित्ताने एकजुटीचा अविष्कार घडवणे पुरेसे नाही तर हिंदूंसमोरील प्रत्येक संकटासाठी आपली संघटनशक्ती दाखवण्याची वेळ आली आहे. ■ ■ ■



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

# खरा आनंद



**राजिंदरसिंहजी महाराज**

सृष्टीच्या सुरुवातीपासूनच मानवाचा हा प्रयत्न आहे की, त्याने आपल्या जीवनात आनंदाने जगावे म्हणून तो अशीच कृती करण्याचा प्रयत्न करतो कि, ज्यामुळे त्याला असे वाटते कि त्याला आनंद मिळेल.

आपल्यापैकी बरेचसे लोक असा विचार करतात की, जेव्हा आपले शरीर सुदृढ असेल, आपल्याजवळ भरपूर पैसा असेल, आपले नातेसंबंध चांगले असतील, एक मोठे घर असेल आणि एक यशस्वी कारकीर्द असेल, तेव्हा आपल्याला खुशी प्राप्त होईल. याकरिता त्याचा असा प्रयत्न असतो की, संसारात काही तरी व्हावे, आपले शारीरिक स्वास्थ्य चांगले राहावे, आपण नावलौकिक कमवावा, धन-दौलत कमवावी, आपले कुटुंबीय व नातेसंबंध चांगल्या प्रकारे निभवावे, या सर्व भौतिक सुखांना प्राप्त करण्यात आपला अमूल्य वेळ या कार्यात खर्च करतो.

हे बाह्य सुख प्राप्त करण्याकरिता आपण त्याच्या मागे बालपणापासूनच धावपळ करीत असतो. जेव्हा मूल जन्माला येते तेव्हा आपण त्याला जगाच्या बाह्य आकर्षणा मध्ये उदाहरणार्थ - खुळखुळा, मोबाईल, संगीतमय खेळणी आणि चहूबाजूला चमचमणारी एक छोटीशी दुनिया बनवितो, जेणेकरून या सगळ्या गोष्टींना पाहून तो खुश रहावा.

जस जसा तो मोठा होतो, तेव्हा आपण त्याला आपली संस्कृती आणि जीवनशैली शिकवितो, कारण की आपल्याला असे वाटते, हे सर्व त्याच्या शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक विकासा करिता आवश्यक आहे. ज्यामुळे तो प्रसन्नतेचे जीवन जगू शकेल. कालांतराने या सर्वांमध्ये अडकून आपल्या मोठ्या वडीलधा?या माणसांसारखेच तो सुद्धा या दुनियेत मग्न होत जातो आणि आपल्या वास्तव आत्मिक स्वरूपाला विसरून जातो.

आपल्यापैकी बरेचसे लोक स्वतःला शरीर आणि मन समजतात. आपला सर्व वेळ आपले शरीर आणि बौद्धिक गरजा पूर्ण करण्याकरता खर्च करतात. कारण की आपल्याला हेच शिकविले जाते की खुशी केवळ या दोन्ही क्षेत्रात सफल झाल्यानेच प्राप्त होते.

जर आपण आपल्या जीवनावर एक नजर टाकली तर आपण सर्व आयुष्य आपल्या मनाच्या इच्छा पूर्ण करण्यात व्यतीत करतो. कोणतेही सुख कायमस्वरूपी नाही कारण की या जगातील प्रत्येक वस्तू नाशवान आहे. या सर्वां पासून आपल्याला खुशी काही काळापुरतीच मिळते.

महापुरुष आपल्याला समजावितात की आपणास खरे सुख प्राप्त करायचे असेल तर, ते बाह्य जगात नसून ते आपल्या अंतरीच आहे. त्याकरिता आपल्याला आपले लक्ष बाह्य दुनियेच्या आकर्षणा पासून हटवून आपल्या आत्म्याकडे लावलं पाहिजे. ■ ■ ■

## गुढी उभारण्याचे धर्मशास्त्र!

चैत्र शुक्ल प्रतिपदा अर्थातच गुढीपाडवा! या दिवसापासून हिंदू नववर्षाची सुरुवात होते. नवचैतन्य आणि समृद्धीचे प्रतीक असलेली गुढी उभारून आपण हा सण उत्साहात साजरा करतो. गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी सूर्योदयानंतर लगेचच गुढी उभारावी. घरात उभे राहून पाहिल्यास दाराच्या उजव्या बाजूला गुढी उभारावी.

गुढी उभारण्यासाठी वेळूची काठी, साखरेच्या गाठींची माळ, रेशमी वस्त्र, आंब्याच्या पानांची डहाळी, कडूलिंबाची पाने आणि तांब्याचा कलश यांचा उपयोग केला जातो. या प्रत्येक घटकाचे आध्यात्मिक महत्त्व आहे. गुढीवरील तांब्याच्या कलशावर कुंकवाने स्वस्तिक काढले जाते आणि तो गुढीवर उलटा ठेवला जातो. हल्ली काही लोक स्टीलचे किंवा मडक्याच्या आकाराची भांडी ठेवतात. मात्र, गुढी उभारतांना त्यावर तांब्याचा कलश ठेवावा असे धर्मशास्त्र सांगते. तसेच कलश उपडा ठेवणे अशुभ आहे, असा देखील चुकीचा समज पसरवण्यात येत आहे. तेव्हा गुढीवर ह्यतांब्याचा कलश उपडा का ठेवावाह्ल याचे धर्मशास्त्र जाणून घेऊ या.

**वाचक लिहितात**

गुढीपाडव्याच्या दिवशी वातावरणात प्रजापती लहरींचे प्रमाण अधिक असते. गुढीवर उलट घालण्यात आलेल्या कलशाच्या काही प्रमाणात निमुळत्या झालेल्या भागातून तो वातावरणातील प्रजापति-लहरी आकृष्ट करतो. या लहरी कलशात सामावून रहातात. कलश उलट घातल्यामुळे या लहरी जमिनीकडे येतात आणि पूजा करणाऱ्याला त्याचा आध्यात्मिक लाभ होतो. तसेच या लहरींमुळे भूमीची उपजाऊ क्षमता वाढण्यास मदत होते. म्हणूनच कोणत्याही चुकीच्या प्रसाराला बळी न पडता, धर्मशास्त्रानुसार गुढीची उभारणी करून तिच्यातील चैतन्याचा लाभ करून घ्यावा!

■ **सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.**

## राणे, आझमींनी नेतृत्व करावे...

मागील काही महिन्यांपासून, राज्यात, देशात पुन्हा एकदा हिंदू-मुस्लीम वाद सुरू हेतुपुरस्सरकरण्यात आला आहे. हिंदू मुस्लिम दंगलीत कोणत्याही हिंदू-मुस्लिम आमदार खासदार किंवा कोणत्याही हिंदू-मुस्लिम नेत्यांनी एकमेकांचे डोके फोडले अशी बातमी कधीच ऐकली नाही.

हे राजकीय नेते कडक सरकारी सुरक्षा रक्षकांचा वापर करून राहतात आणि फिरतात. .एअर कंडिशनिंग बंगल्यांमध्ये सुरक्षित बसून लोकांना भडकावतात आणि त्यांचे ऐकून मूर्ख जनता रस्त्यावर येऊन एकमेकांचे डोके फोडतात.

धर्मरक्षण... धर्मरक्षण म्हणून नेते आणि त्यांचे चेलेचपाटे सतत बोंबा मारत असतात, मात्र, प्रत्यक्षात किती नेते रस्त्यावर उतरतात? हिंदू-मुस्लिमांनी जरूर दंगली कराव्यात. पण आधी नितेश राणेला रस्त्यावर येऊन हिंदूंचे नेत्रुत्व करायला सांगा आणि अबू आझमीला रस्त्यावर येऊन मुस्लिमांचे नेत्रुत्व करायला सांगा.!

■ **विवेक बडवाईक, नागपूर.**

# नवचैतन्य व मांगल्याचे प्रतिक

फाल्गुन महिना म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा महिना व यात होळी/धुलीवंदन म्हणजे जुन्या वर्षीचा शेवटचा सण साजरा करून संपणाऱ्या वर्षाला निरोप दिला जातो व नवीन वर्षाचे स्वागत केले जाते.

फाल्गुन नंतर चैत्र महिना लागतो हा महिना म्हणजे मराठी माणसासाठी नवीन वर्षाची सुरुवात म्हणजेच नवचैतन्य. हिंदु धर्मासाठी व मराठी माणसांसाठी गुढीपाडवा अत्यंत महत्वाचा सण म्हणून साजरा केला जातो. गुढीपाडव्याचे संपूर्ण शुभ संकेत पुरातन काळापासून आपल्याला पहायला मिळतात. कारण गुढी हे समृध्दी, मांगल्य, चैतन्य व विजयाचे प्रतिक आहे.

हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवा सण साजरा करतो. आपल्या दाराशी गुढी उभारून समाजाला व जगाला विजयाचे आणि समृद्धीचे प्रतिक दर्शविण्यात येते. गुढी म्हणजे उत्सवाचे मोठे प्रतिकच !कारण याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामचंद्रांनी वालीचा वध करून त्याच्या छळापासुन प्रजेला मुक्त केले. त्याचप्रमाणे रामाने असुरी शक्तीचा नायनाट केला. याच दिवशी प्रभूरामचंद्रांचा वनवास संपला होता म्हणून हा दिवस आनंदोत्सवाचा दिवस मानण्यात येतो.

याच दिवशी ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली हाच तो पवित्र दिवस. भगवान विष्णूंनी मत्स्य रूप धारण करून याच दिवशी शंकासुरचा वध केला. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्री शालिवाहन राजाने शके गणनेला सुरूवात केली. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला. मग या सैन्याच्या मदतीने त्याने शत्रूंचा पराभव केला अशी आख्यायिका सुध्दा आहे.

अशा प्रकारे पुरातन काळापासून आजपर्यंत विजयी दिवस म्हणून गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.आजच्या दिवशी घरा-घरामध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे या उद्देशाने गुढी उभारताना चांदीच्या किंवा तांब्याच्या किंवा पितळीचा लोटा, गोडवा निर्माण व्हावा म्हणून गाठी, शांतीच प्रतीक म्हणून आंब्याची डाहळी, कडु निंबाची डहाळी औषधीचे प्रतिक म्हणून गुढीमध्ये नवे कापड इत्यादींच्या माध्यमातून गुढी उभारून गुढीपाडवा सण साजरा केला जातो.

या मागचा एकच उद्देश असतो की सर्वांचे आरोग्य सुदृढ रहावे, नवचैतन्य निर्माण व्हावे आणि मराठी नवीन वषार्ची सुरुवात आनंदाने व्हावी व खेळीमेळीचे वातावरण निर्माण करून सर्वांनीच प्रगतीचा उच्चांक गाठावा व आरोग्य सुदृढ आणि निरोगी रहावे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**नागपूर.**

या दिवसाला प्रत्येक जन आपल्या दारांमध्ये आंब्याच्या पानांचे तोरण बांधून व दारांसमोर रांगोळी काढून नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. गुढीपाडवा आपण नववर्षाच्या उद्देशाने साजरा करतो.कारण येणारे दिवस सुखसमाधानाचे, सुखसमृद्धीचे जावो आणि येणारी पीढा व दुःख दुर व्हावे हाच यामागचा खरा उद्देश आहे. आपल्या मनातील स्वार्थीपणाची वृत्ती नष्ट होवून नवीन वर्षापासून आपले मन शांत,स्थीर व सात्त्विक बनविण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे. हाच खरा विजयी दिवस व गुढी उभारणे हे खऱ्या अर्थाने विजयाचे प्रतिक व सार्थक समजण्यात येईल.

चैत्राची सुरूवात ज्या दिवसाने होते तो दिवस म्हणजे गुढीपाडवा. याच दिवसांपासून रामाचे नवरात्र सुरू होते व ते रामनवमीला संपते. या दिवसाला इतके महत्त्व आहे की हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. गुढीपाडव्याला प्रत्येक घरावर गुढी उभारून नवीन वर्षाची सुरुवात केली जाते व आनंदोत्सव साजरा केला जातो. त्याचप्रमाणे आल्हाददायक वसंत ऋतू नंतरचा उन्हाळा बाधू नये म्हणून वर्षाच्या सुरुवातीलाच कडूनिंबाचे पाणे खावीत असे आयुर्वेद शास्त्र सांगतो.

गुढीपाडवा विविध राज्यांत वेगवेगळ्या नावांनी साजरा केला जातो. गुढीपाडवा हा फक्त धार्मिक, सांस्कृतिक गोष्टींनीच जोडलेला नसुन त्यात निसगार्चा व पर्यावरणाचा सूध्दा विचार केल्याचे दिसून येते. गुढीपाडव्याला प्रत्येकाने आपल्या प्रकृतीची काळजी घेवून पुढील वाटचाल करावी. मराठी नववर्ष जगावेगळे असल्याचे आपल्याला दिसुन येते. इंग्रजी नववर्षाच्या सुरुवातीला जगभर दिखावा करून जल्लोष साजरा करण्यात येतो. परंतु मराठी नववर्ष संय्यमतेने, आनंदाने, आदरतिथ्याने, प्रेमाने, मानसन्माने आणि आरोग्याचा दृष्टीकोन समोरं ठेवुन साजरा करण्यात येतो.

त्यामुळे जगाचे नववर्ष व महाराष्ट्राचे नववर्ष यात मोठा फरक दिसून येतो. वाढते प्रदूषण पहाता सर्वांनीच मास्कचा वापर करावा व आरोग्याची काळजी घ्यावी.महाराष्ट्रासह भारतात वाढते प्रदूषण पहाता व वाढते वनवे पहाता मराठी नववर्षाच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे. यामुळे प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मदत होईल.

गुढीपाडव्याला प्रत्येकांनी वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल. यामुळे गुरांना चारा, पशु-पक्षांना सावली, मानवाला शुद्ध हवा आणि सर्वांना शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. यामुळे संपूर्ण पृथ्वीतलावर आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. यातच आपल्याला खरा गुढीपाडव्याचा व नवीन वषार्चा विजयत्सोव व आनंदोत्सव दिसून येईल. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा! ■ ■ ■

# झुंझार कविता : बा स्वातंत्र्या!

**(कालच्या अंकावरून पुढे)**

आश्वासनखोर, लबाड सत्ताधीश रयतेला न्याय देऊच शकत नाही.

म्हणून म्हटलं जातं,

*राजकारण-राजकारण,*
*खुर्चीसाठी अब्रू तारण*
*राजकारण गटार गंगा,*
*हाही नंगा-तोही नंगा !*

कोंबड्या - बकऱ्या सारखे का जगावे? कुणाला सावज का मानावं? कविता रसिक डोक्यावर घेतात, रुपयाचे अवमूल्यन असे अनेक प्रश्न हा चिंतनधर्मी कवी ऐरणीवर आणतो.

सौ. वंदना सोबत आहे, म्हणून कवी शंकर घोरसे मांगल्याचे पक्षधर असल्याने; वंदनीय कामं करतात. म्हणून मित्रवर्य महाकवी सुधाकर गायधनी व राम भोंडे त्यांचं कौतुक करतात. सामान्यांच्या




जिंदगीचे मोजमाप प्रखर उन्हात बसूनच होऊ शकते. दारिद्रयाचे निकष वातानुकुलीत खोलीत बसून कसे करता? यासह नियोजन आयोगालाही खडे बोल सुनावणारा हा झुंजार कवी आहे. मराठी कवितेच्या दालनाला समृद्ध करणाऱ्या या दमदार कवीस खूप शुभेच्छा!

-----------

**डी. बी. जगत्पुरिया**
**9860485398**
**औरंगाबाद.** ■

# उन्हाळ्यात त्वचेच्या काळजीसाठी अद्रक अत्याधिक फायदेशीर

आपण आल्याचा चहा, आल्याची कॉफी घेताना ऐकले असेल. अशातच आपल्यासाठी आल्याचा वापर हा मसाल्याच्या पदार्थ म्हणून केला जातो. आल्याचा वापर आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तुम्हाला माहिती आहे का की उन्हाळ्यात त्वचेच्या काळजीसाठी आले देखील खूप फायदेशीर आहे.

उन्हाळ्यात आहारांमध्ये आल्याच्या वापर करताना प्रमाणाची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. त्यानूसार तुम्ही त्याचे सेवन करू शकतात. कारण यात असलेले त्यात अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात, जे डाग कमी करण्यासह त्वचेला चमकदार बनवण्याचे काम करतात.





**वृद्धत्व विरोधी गुणधर्म**

आल्यामध्ये अँटी-ऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे आपल्या त्वचेला अकाली वृद्धत्वापासून वाचवण्यास मदत करतात. हे मुक्त रॅडिकल्सशी लढण्यास मदत करते. आल्यामध्ये असलेले जिंजरॉल नावाचे घटक त्वचेमध्ये कोलेजन उत्पादन वाढवतात.

**सूज कमी होते**

कधीकधी त्वचेवर सूज, लालसरपणा आणि जळजळ यासारख्या समस्या उद्भवू शकतात. आल्याचे दाहक-विरोधी गुणधर्म जळजळ कमी करण्यास मदत करतात. नियमितपणे आल्याचे सेवन केल्याने जळजळ होत नाही. यामुळे लालसरपणाची समस्याही उद्भवत नाही.

मुरुम कमी करण्यासाठीही आले खूप फायदेशीर आहे. आल्यामध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म मुरुमांना कारणीभूत असलेल्या बॅक्टेरियाशी लढण्यास मदत करतात. आल्याची पेस्ट करून तुम्ही ती मुरुमांच्या ठिकाणी लावणे खूप फायदेशीर ठरेल.

**चमकदार त्वचा**

आल्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि झिंक सारखे घटक आढळतात, जे त्वचेसाठी खूप फायदेशीर असतात. हे त्वचेला नैसर्गिक चमक देण्यास मदत करते. आल्याचा रस त्वचेचा रंग सुधारण्यास आणि चमकदार करण्यास मदत करू शकतो. आलं मृत त्वचेच्या पेशी काढून टाकते आणि नवीन पेशींच्या वाढीस प्रोत्साहन देते.

तथापि उन्हाळ्यात फक्त ४ ते ५ ग्रॅम आल्याचे सेवन करावे. ■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### गुडीपाडवा

**देश राहीला पारतंत्र्यात**
**प्रभाव पडला इंग्रजांचा**
**शके संवत्सरापेक्षा सुलभ**
**वाटे कॅलेंडर इंग्रजी तिथीचा**

**ग्रह गतीचा करूनी अभ्यास**
**करते हिंदू शास्त्र भाकीत**
**ग्रहणही त्याच वेळेस लागे**
**करते मनाला अचंबित.. !**

**हिन्दू संस्कृती श्रेष्ठ असे**
**येते जगी वारंवार प्रचिती**
**पाश्चिमात्यांच्या नादी लागून**
**करूनका व्यर्थ भ्रमंती... !**

# भक्तिमार्ग

## वादविवाद थांबवण्यासाठी

वास्तू भक्ती

- कुटुंबातल्या माणसांचे स्वभाव, आचार-विचार पूर्णपणे वेगळे असतात. एकमेकांची मतं पटत नाहीत. सर्वांचा त्रास होतो. यामुळे कुटुंबातल्या सदस्यांमध्ये भांडणं, वाद, क्लेश, कलह होत असतात. घरातलं वातावरण कलुषित होतं. सतत अशांती राहते. वास्तूशास्त्रातल्या सरळ-सोप्या उपायांनी ही समस्या दूर करता येते. घरात वादविवाद होत असतील तर काय करायला हवं याविषयी...
- घरातल्या सदस्यांनी एकत्र बसून जेवण केलं पाहिजे. दिवसातून एक वेळ तरी सर्वांनी एकत्र जेवण घ्यायला हवं. जेवणासाठी स्वयंपाकघरात बसा. यामुळे राहूचा प्रभाव कमी होऊन घरात शांतता टिकून राहते.
- घरातल्या महिलांचं एकमेकांसोबत पटत नसेल तर त्यांनी एकाच वेळी लाल कपडे घालू नयेत.
- घरातल्या अशांतीला एखादी महिला जबाबदार असेल तर पांढऱ्या मोत्याची अंगठी तयार करून उजव्या हाताच्या करंगळीच्या शेजारच्या बोटात घातली पाहिजे.
- चंदनापासून तयार केलेली देवाची मूर्ती घरात ठेवा.



ही मूर्ती प्रत्येकाचं लक्ष जाईल अशा ठिकाणी ठेवा. यामुळे ताणतणाव कमी होऊन एकमेकांमध्ये विश्वास निर्माण होऊ शकेल.

- विनाकारण वाद होत असतील तर घरातल्या पुरूषांनी गुरूवारी दाढी करू नये. तसंच केसही कापू नयेत.
- सकाळी आंघोळ केल्यानंतर घरात गंगाजल शिंपडा.
- कचराकुंडी घराच्या उत्तर-पूर्व दिशेला असू नये. यामुळे कुटुंबातल्या सदस्यांमध्ये एकमेकांविषयी कटूता निर्माण होऊ शकते.

## नवसंवत्सराचं स्वागत असो

आरंभ विशेष

***साडेतीन मुहुर्तांपैकी एक असलेल्या गुढी पाडव्यापासून नवीन संवत्सराला सुरूवात होते. या सणाशी अनेक कथा संबंधित आहेत. सध्याच्या असुरक्षित आणि जीवघेण्या स्पर्धेच्या जमान्यात सण तसेच उत्सवांमधून मिळणारा आनंद मोलाचा आहे. पण तो घेतानाच प्रत्येकाने सन्मार्गाने वागण्याचा संकल्प करायला हवा. इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करता आला तरच खऱ्या अर्थाने सण साजरे झाले असे म्हणता येतील.***



गुढी पाडवा... वर्षारंभाचा एक मंगल दिवस... कालगणनेचं सूत्र गवसलं तेव्हापासून पळ, प्रहर, दिवस, मास, वर्ष अशी गणना सुरू झाली आणि वेगवेगळ्या संस्कृतींनी वेगवेगळ्या परिमाणांनिशी ती अंगिकारली. इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे एक जानेवारी रोजी नववर्षाचा प्रारंभ केला जातो. भारतात महाराष्ट्र आणि अन्य काही राज्यांमध्ये चैत्र शुक्ल प्रतिपदा म्हणजे गुढी पाडव्याच्या दिवशी नववर्षारंभ होतो. हा सण गुढी पाडवा म्हणून ओळखला जातो. या सणाचे वैशिष्ट्य म्हणजे तो वसंताचे स्वागत करण्यासाठी येतो. क्रांतीवृत्त आणि विषुववृत्त एकमेकांना छेदतात त्या छेदनबिंदूला वसंत संपात बिंदू आणि शरद संपात बिंदू असे म्हणतात. सूर्य २१ मार्च रोजी विषुववृत्तावर वसंत संपात बिंदूपाशी येतो. त्या दिवशी पृथ्वीवर सर्वत्र दिनमान आणि रात्रीमान समान असते. याच सुमारास चैत्र महिन्याचा प्रारंभ होतो. चैत्र शुक्ल प्रतिपदेला आपण सकाळी लवकर उठून घराची स्वच्छता करतो. अंगाला सुवासिक तेल लावून अभ्यंगस्नान करतो. दरवाजाजवळ रांगोळी काढली जाते, नवी वस्त्रे परिधान करून देवाची पूजा केली जाते. घराच्या दरवाज्याला आंब्याच्या पानांचं तोरणं बांधलं जातं. लांबसडक काठी घेऊन, स्वच्छ धुवून, टोकाला तांबडे वस्त्र आणि फुलांची माळ, साखरगाठी घालून त्यावर कलश ठेवला जातो. अशा रितीने तयार केलेली गुढी दरवाजासमोरील रांगोळीवर उभी केली जाते. त्याला ब्रह्मध्वज असे म्हणतात. या ब्रह्मध्वजाची विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर कडुनिंबाची कोवळी पाने घेऊन त्यात जिरे, मिरे, हिंग, सैंधव, मीठ आणि ओवा घालून मिश्रण वाटून घेतात. हे मिश्रण थोडे थोडे घ्यायचे असते. वर्षारंभी हे मिश्रण खाल्ल्याने वर्षभर आरोग्य चांगले राहते असा समज दृढ आहे. पण कडुनिंबाचे जास्त सेवनही अपायकारक आहे हे लक्षात घ्यायला हवे. पंचपक्वानांचे भोजन करून हा दिवस आनंदात घालवला जातो. आधुनिक काळातही भारतीय शालीवाहन शकवर्षाचा पहिला दिवस युगाब्धाचा पहिला दिवस समजला जातो. त्यादृष्टीनेही पाडव्याचे महत्त्व मोठे आहे.

गुढी पाडव्याच्या दिवशी कडुनिंबाचे महत्त्व मोठे. कडुनिंब ही औषधी वनस्पती. त्यामुळे गुढी पाडव्याच्या निमित्ताने गावागावांमध्ये कडुनिंबाची लागवड केली जायला हवी. खरे तर कडुनिंबाचे विविध गुणधर्म लक्षात घेता तो कल्पवृक्ष आहे असेच म्हणावे लागेल. या 'आर्यविषक' प्राचीन ग्रंथात कडुनिंबाला सर्वरोगपरिहारक म्हटले आहे. यापासून अंगाचा साबण, कीटकनाशके, धूप, हेअर टॉनिक, टुथपेस्ट इत्यादी उत्पादने तयार केली जातात. अलीकडे रासायनिक कीटकनाशकांचे दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे कडुनिंबापासून तयार केलेली कीटकनाशके उपयुक्त ठरू लागली आहेत. पर्यावरणाच्या दृष्टीनेही कडुनिंबाची झाडे गावागावात असणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे या झाडांना पाणी कमी लागते. खडकाळ माळरानावर तसेच डोंगराळ भागातही कडुनिंबाची झाडे चांगली वाढतात. याच्या बियांमध्ये ४० टक्के तेल अणि गंधाचा अंश असतो. भूक न लागणे, उलट्या, आम्लपित्त, काविळ, मळव्याध, पोटातील जंत, केसांमधील उवा या शिवाय त्वचारोग, व्रण, जखमा, विंचूदंश, सर्पदंश, मुखरोग, दातांचे आजार, स्त्रियांचे आजार तसेच सांधेदुखीवर कडुनिंब हे प्रभावी औषध असल्याचे दिसून आले आहे. मात्र, याचा वापर डॉक्टरांच्या सल्ल्यानेच करायला हवा.

गुढी पाडव्याच्या सुमुहूर्तावर वाईट सवयींचा त्याग करून नवीन गोष्टींचा अंमल केला जातो आणि त्या प्रमाणे कृती करण्यास प्रारंभ होतो. वाईट प्रवृत्ती दूर टाकून चांगले काम करण्याचा संकल्प या दिवशी केला जातो. गुढी पाडव्याच्या निमित्ताने काही ठिकाणी शोभायात्रा काढण्यात येतात. यात समाजशिक्षण आणि समाज प्रबोधनासाठी विविध चित्ररथही असतात. नवी वस्त्रे घालून लहान-थोर, रंक-राव, स्त्री-पुरूष एकत्र येऊन आनंदाने या शोभायात्रांमध्ये सामील होतात. मात्र, या शोभायात्रांचा उद्देश सर्वांनी एकत्र येण्याचा आणि समाज प्रबोधनाचाच असायला हवा. त्यातून सामाजिक स्वच्छतेची जाणीव निमाण व्हायला हवी. अंधश्रध्दा निर्मूलन, भ्रष्टाचार निर्मूलन, महिलांची सुरक्षितता, बाल संगोपन या प्रश्नांबाबत समाज प्रबोधनावर भर दिला जायला हवा. असे झाले तरच त्यांचा उद्देश खऱ्या अर्थाने सफल होऊ शकेल.

गुढी पाडव्याच्या सणाविषयी अनेक प्रकारे उत्पत्ती सांगण्यात येतात. ब्रह्मदेवाने या दिवशी विश्वाची निर्मिती केली असे सांगण्यात येते. याच दिवशी शालिवाहन राजाने शकाचा पराभव करून जनतेची त्रासातून सुटका केली. म्हणून या दिवसापासून शकाचा प्रारंभ करण्यात आला. ज्याने पराभव केला तो शालीवाहन आणि ज्यांचा पराभव झाला ते शक. या दोघांचाही उल्लेख म्हणून 'शालीवाहन शक' असा शब्दप्रयोग वापरला जाऊ लागला. भगवान विष्णुंनी प्रभू रामचंद्रांचे रूप घेऊन दुष्ट रावणाचा पराभव केला. विजयश्री मिळवणाऱ्या प्रभू श्री रामचंद्रांनी अयोध्येत प्रवेश मिळवला तो दिवस म्हणजे चैत्र शुक्ल प्रतिपदा. या दिवशी जनतेने प्रभू रामचंद्रांचे गुढ्या, तोरणे उभारून स्वागत केले. म्हणून या दिवशी सर्वत्र गुढ्या-तोरणे उभारून आनंदोत्सव साजरा केला जातो. अशी या महत्त्वाची सणाची परंपरा वर्षानुवर्षे त्याच उत्साहाने आणि श्रध्देने पाळली जात आहे.

सध्या प्रत्येकाचे जीवन असुरक्षित झाले आहे. सर्वत्र जीवघेणी स्पर्धा जाणवत असते. तसेच महागाईनेही कहर केला आहे. मंदिरात देवाचे मार्केटिंग चालले आहे. अशा वेळी प्रत्येकाने स्वत:ला समजून घेऊन सन्मार्गाचा अवलंब करायला हवा. ईश्वरपूजा केल्याने ईश्वरात बदल होत नसतो तर तो पूजा करणाऱ्यांमध्ये होत असतो. तसा बदल झाला नाही तर पूजा करण्याचा उद्देशच सफल होणार नाही. आपले सण-उत्सव मनाला आनंद प्राप्त करून देतात तसेच ते ऋतूवरही आधारित आहेत. त्यामुळे सणादिवशी घेतलेला आहार किंवा पक्वान्न शरीराचे आरोग्य सांभाळतात. मनाचे आणि शरीराचे आरोग्य चांगले रहावे म्हणून सण-उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे करायला हवेत. पण सण साजरे करताना दुसऱ्याला त्रास होणार नाही याचीही काळजी घ्यायला हवी. इतरांना मदत करून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करायला हवा. स्वत: आनंदाने जगणे आणि इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करणे हाच सणांचा तसेच उत्सवांचा खरा अर्थ आहे. सुख वाटले तर वाढते आणि दु:ख वाटले तर कमी होते. म्हणून सणाच्या निमित्ताने साऱ्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे. आजच्या विभक्त कुटुंबपध्दतीत सणांच्या तसेच उत्सवांच्या निमित्ताने तरी सारेजण एकत्र येतात आणि आनंद साजरा करतात. यालाच गुढी पाडव्याचा खरा आनंद म्हणता येईल. या दिवशी चांगल्या कामाचा प्रारंभ करावा. नव्या वस्तूंची खरेदी करावी. सुमुहूर्त असल्याने कोणत्याही चांगल्या कामाची मुहूर्तमेढ रोवण्यास हा दिवस योग्य आहे.

## आनंद दडलाय मनात



या जगात आलेल्या प्रत्येक माणसाने सतत कर्म करत रहायला हवं. क्रियाशील राहून प्रत्येक क्षणाचा पुरेपूर आनंद घ्यायला हवा. आपल्या आयुष्यातलं प्रत्येक सुख आणि दु:ख अंतर्मनाशी निगडित असतं. विविध विकारांच्या चक्रात आपण अडकतो. हे विकार आपल्याला जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करत असतात पण स्वत:वर नियंत्रण मिळवणाऱ्या व्यक्तीला कशाचीही भीती उरत नाही. तसंच त्याच्या मनात विकारही उत्पन्न होत नाहीत. स्वत:मध्येच सुख दडलंय असं शास्त्रांमध्ये नमूद करण्यात आलंय. माणसाला आयुष्यात काही प्राप्त करायचं असेल तर ते आपल्या आत शोधलं पाहिजे. आत्मनिर्माणातून मनुष्य जिवंतपणी मोक्ष आणि परमानंदाची प्राप्ती करू शकतो. काम, क्रोध, मोहासारखे नकारात्मक विकार दूर ठेवल्याने आपलं आयुष्य स्वर्गासारखं बनू शकतं. सगळे आनंद आपण उपभोगू शकतो. भौतिक वस्तूंमधून माणसाला कोणताही आनंद प्राप्त होत नाही. त्याचं मन दुसऱ्या वस्तूंकडे, इतर सुखांकडे आकर्षित होत असतं. एक इच्छा पूर्ण झाली की मनात दुसरी इच्छा घर करते. इच्छांची ही मालिका संपत नाही.

धन, संपत्ती, पद, प्रतिष्ठा सगळं मिळवूनही माणसाच्या आत रिकामपण भरून राहिलेलं असतं. याबाबत एक उदाहरण सांगता येईल. एक माणूस यशस्वी उद्योजक बनला. आपल्या क्षेत्रात तो यशाच्या शिखरावर जाऊन पोहोचला. त्यावेळी त्याला एक प्रश्न विचारण्यात आला. व्यवसाय सुरू करताना तुम्हाला कोणता सल्ला अपेक्षित होता? यावर तो म्हणाला, शिखरावर पोहोचल्यानंतरही आपल्या हाती काहीही रहात नाही, याची जाणीव मला कुणी तरी करून द्यायला हवी होती. माणूस एखाद्या लक्ष्याचा पाठलाग करतो. ते लक्ष्य प्राप्त करण्यासाठी जंग जंग पछाडतो. पण यात काहीही अर्थ नव्हता याची जाणीव त्याला एका क्षणी होते.

आपलं शरीर पाच तत्त्वांनी बनलंय. जल, वायू, अग्नी, पृथ्वी आणि आकाश अशी ही पाच तत्त्वं होत. मनुष्याचा जन्म या तत्त्वांनी झालाय आणि अंती याच तत्त्वांमध्ये त्याला मिसळून जायचंय, असं गीतेत नमूद करण्यात आलंय. मुक्ती हवी असेल तर आपली सगळी कर्मं परमेश्वरचरणी अर्पण केली पाहिजेत. मोक्षप्राप्तीचा हा अत्यंत साधा आणि सरळ मार्ग आहे. आपण चिंता करत बसू नये. कुणालाही घाबरू नये. आपल्याला कुणीही मारू शकत नाही. या जगात जे घडतंय ते चांगलंच आहे. आजवर जे झालं ते चांगलंच झालं. यापुढे जे होईल तेही चांगलंच असेल, असा विचार कायम मनात ठेवा. आपल्यापैकी प्रत्येकाने वर्तमानात जगलं पाहिजे. मागे सुटलं त्याबद्दल रडत बसू नका. जे झालं ते झालं. आपण येताना काहीही घेऊन आलो नाही. तसंच सोबत काही घेऊन जाणार नाही. आपण काहीही निर्माण केलं नाही. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा वृथा अभिमान बाळगू नका.

## पूजनात का असतं केळं?




जाणून घ्या

हिंदू धर्मातल्या प्रत्येक पूजेत केळ्याला महत्त्वाचं स्थान दिलं जातं. पूजा सत्यनारायणाची असो वा दिवाळीतली, पूजन साहित्यात केळ्याचा समावेश असतोच. सत्यनारायणाचा प्रसाद मानलं जात असल्याने केळं कधीही खराब होत नाही, असं म्हणतात. अर्थात हे पुराणात नमूद करण्यात आलंय. पण यापेक्षा वेगळा विचार कधी केलाय का? म्हणूनच केळ्याला पूजनात महत्त्वाचं स्थान का बरं दिलं गेलं असावं, हे जाणून घेणं उत्सुकतेचं ठरू शकतं. केळ्याच्या झाडात देवगुरू ब्रृहस्पतीचा वास असतो असं म्हणतात. सलग सात गुरूवार केळ्याची पूजा केल्याने सगळ्या मनोकामना पूर्ण होतात, असं शास्त्रांमध्ये नमूद करण्यात आलंय.

केळ्याच्या वृक्षात गुरू बृहस्पतींसोबतच श्रीविष्णूंचाही वास असतो, असं मानलं जातं. म्हणूनच केळ्याची पूजा गुरूवारी केली जाते. श्रद्धा आणि भक्तीभावाने केळ्याच्या झाडाची पूजा केली तर श्रीविष्णू प्रसन्न होतो, अशी श्रद्धा आहे. केळं सौभाग्य आणि सुखाचं प्रतिक मानलं जातं. केळ्याच्या पूजनाने गुरूसंबंधीचे दोष दूर होतात. घरात केळ्याची पूजा केल्याने चांगले लाभ होतात. असं असलं तरी घरात केळ्याचं रोपटं असू नये. घरात केळ्याचं रोपटं आणल्यास घरच्या प्रमुखाच्या प्रगतीत बाधा येतात, असं म्हटलं जातं. केळ्याचं झाड अंगणात लावायला हवं. झाडाची पूजा पारंपरिक पद्धतीने केली गेली पाहिजे.

केळ्याच्या पूजनाची ठराविक पद्धत आहे. त्यानुसार ब्राह्म मुहुर्तावर उठून मौनव्रताचं पालन करा. लवकर स्नान करून घ्या. केळ्याच्या झाडाला नमस्कार करून जल अर्पण करा. त्यानंतर हळद कुंकू वहा. चणा डाळ आणि गुळ अर्पण करा. अक्षता, फुलं वहा. प्रदक्षिणा घाला. घराबाहेरच्या केळ्याच्या झाडाची या पद्धतीने पूजा केली पाहिजे. या पूजनामुळे विष्णू प्रसन्न होतो आणि इच्छित फळाची प्राप्ती होते, असं म्हणतात.

## सल्ला शुक्राचार्यांचा



धर्मशास्त्रातून...

शुक्राचार्य हे दैत्यांचे गुरू. ते विद्वान होतेच शिवाय खूप चलाखही होते. त्यांच्या शिकवणीला शुक्रनीती असं म्हटलं जातं. ही शिकवण आजही उपयुक्त ठरू शकते. आपल्याबाबतच्या काही गोष्टी इतरांपुढे उघड करू नयेत, असं शुक्राचार्य सांगतात. या गोष्टी उघड केल्याने आपलं नुकसान होऊ शकतं. याबाबत जाणून घेऊ...

* तुम्ही माणूस म्हणून खूप चांगले आहात. अनेक लोक तुमचा आदर करतात. तुमच्यावर प्रेम करतात. ही बाब चांगली म्हटली पाहिजे. पण याबाबत इतरांना काहीही सांगू नका. यामुळे इतरांच्या नजरेत तुमचा आदर कमी होईल.

* तुमचा अपमान झाला असेल तर त्याची जाहीर वाच्यता करू नका. हा अपमान स्वत:च्या मनातच दडपून टाका. अपमानाची वाच्यता केल्यास इतरांच्या आयुष्यातली तुमची किंमत कमी होईल.

* देवाची आराधना करताना विशेष मंत्र म्हणत असाल तर त्याबाबत जाहीरपणे काहीही सांगू नका. साधनेची जाहीर वाच्यता केल्यास तुमच्या इच्छा पूर्ण होणार नाहीत.

* तुमच्या उत्पन्नाबाबत किंवा तुमच्याकडे असलेल्या धनाबाबत कुठेही वाच्यता करू नका. यामुळे इतरांच्या मनात तुमच्याबद्दल ईर्ष्या उत्पन्न होईल तसंच तुमच्या जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो.

* वय आणि शारीरिक क्षमतेचा कोणताही संबंध नसतो. तुमचं वय कुणापुढेही उघड करू नका. कुणी विचारलं तरच वयाबाबत महिती द्या.

* आयुष्यातल्या वाईट काळातून जात असाल, काही गृहदोष असतील तर त्याबाबत वाच्यता करू नका. या समस्यांवर उपाय सापडणार नाहीत.

* तुमच्या तब्बेतीबाबत डॉक्टरांना सगळं माहिती असतं. त्यामुळे कोणत्या डॉक्टरांचा सल्ला घेताय याबाबत कुणाला काहीही सांगू नका.

* आपल्या प्रेमाबाबत, जोडीदारासोबतच्या नाजूक क्षणांबाबत कुणाला काही सांगू नका.

* आपण दिलेल्या दानाबद्दल कुणालाही सांगू नये. दान गुप्त असावं. उजव्या हाताने दिलेलं दान डाव्या हातालाही कळू नये, असं म्हणतात.

## मंदिरं हनुमंताची



भक्ती आणि बोध

अयोध्या हे श्रीरामाचं जन्मस्थान तर लखनऊ ही उत्तर प्रदेशची राजधानी. लखनऊ ते अयोध्या हे अंतर १३५ किलोमीटर आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २७ वरून जायचं असेल तर लखनऊहून अयोध्येला अवघ्या दोन-अडीच तासात पोहोचता येतं. अर्थात या दोन शहरांचा उल्लेख करण्याचं कारण म्हणजे इथली हनुमानाची मंदिरं. या दोन शहरांमधल्या हनुमान मंदिरांच्या निर्मितीत आणि जीर्णोद्धारात मुस्लीम शासकांचा सहभाग आहे. म्हणूनच हनुमानाची ही दोन्ही मंदिरं अनोखी मानली जातात. या मंदिरांमध्ये हिंदूधर्मीय हनुमानापुढे नतमस्तक होतात. तर मुस्लीमधर्मीय येथे नमाज अदा करतात. अयोध्येतले हनुमान गढी मंदिर प्राचीन मानलं जातं. हे मंदिर हिंदू-मुस्लीम एकतेचं प्रतिक मानलं जातं. शरयू नदीच्या तीरावर हे मंदिर वसलंय. हे मंदिर बरंच जुनं आहे. जवळपास ३०० वर्षांपूर्वी या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला होता. अयोध्येचा तत्कालीन शासक मन्सूर अलीने या मंदिराचा जीर्णोद्धार केला. याबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. मन्सूर अलीच्या एकुलत्या एका मुलाची तब्बेत बिघडली. त्यावेळी एका झाडाखाल्या हनुमान मंदिरात त्याने प्रार्थना केली. हनुमानाच्या कृपेमुळे मुलगा ठणठणीत झाला. त्यानंतर मन्सूर अलीने या ठिकाणी भव्य मंदिराची निर्मिती केली. लखनऊमधल्या अलीगंज परिसरातही हनुमानाचं असंच एक मंदिर आहे. जवळपास २०० वर्षांपूर्वी मोहंमद अली शाहने या मंदिराची निर्मिती केली. यामागेही एक कथा आहे. मोहंमद अली शाह हा अवधचा शासक होता. त्याला अपत्य नव्हतं. शाहच्या पत्नीला एक स्वप्न पडलं. इस्लामवाडी परिसरात हनुमानाची एक मूर्ती जमिनीखाली दडली असल्याचं तिला स्वप्नात दिसलं. दुसऱ्या दिवशी सकाळी ही मूर्ती बाहेर काढण्यात आली आणि त्या ठिकाणी हनुमानाचं मंदिर उभारण्यात आलं. यानंतर शाहला अपत्य झाल्याचं बोललं जातं.



## फक्त पैसा नाही तर मान कमवा



भक्ती मार्ग

पैशामुळे जीवनातली अनेक सुखं आपल्या दारी उभी राहतात. म्हणूनच प्रत्येकजण पैसा कमावण्याच्या मागे आहे. धन-दौलत, पद-प्रतिष्ठा हे सगळं मिळायला हवं. या जगात प्रत्येकाकडे समान संपत्ती नाही. कुणाकडे जास्त पैसा आहे. कुणाकडे गरजेपुरता पैसा आहे तर कुणाकडे अत्यंत कमी पैसा आहे. पण आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी लागेल इतका पैसा प्रत्येकाकडे असतो. अर्थात पैसा योग्य मार्गाने कमावला तर सोबत प्रतिष्ठाही मिळते. काळा पैसा असेल तर तुरूंगवास भोगावा लागतो. बदनामी तर होतेच शिवाय कमावलेला पैसा हातचा जातो. त्यामुळे कष्टाचा पैसा महत्त्वाचा मानला गेला आहे. पैशांसोबत तुमच्याकडे प्रतिष्ठाही असली पाहिजे. लोकांनी तुमचा आदर केला पाहिजे. आदराने वागलं आणि बोललं पाहिजे. धन, दौलतीमुळे मिळणारी सगळी सुखं आपण उपभोगतो पण प्रतिष्ठा आणि आदराचा आनंद उपभोगणारी माणसं खूपच कमी असतात. या जगात तुम्हाला मान मिळत असेल तर त्याचा भरपूर उपभोग घ्या.

पैसा नश्वर आहे. लक्ष्मी चंचल असते असं म्हणतात. मृत्यूनंतर पैसा इथेच सोडून जायचा असतो पण मान, प्रतिष्ठा आपल्यासोबत राहते. यामुळे समाधान मिळतं. एक वेळ पैसा कमी असेल तरी चालेल पण अनादर झालेला चालणार नाही. आपल्या वर्तणुकीने मान सन्मान कमवायचा असतो. पैसा काही काळ प्रतिष्ठा मिळवून देऊ शकतो पण त्यानंतर आपली कर्मंच मोक्षाकडे घेऊन जातात. धनसंचय जरूर करावा पण गरजूंना दानही केलं पाहिजे. मान-सन्मान, प्रतिष्ठा हीच आपली खरी कमाई म्हटली पाहिजे. त्यामुळे पैसा कमावला तरी त्यासाठी योग्य मार्गाची निवड करा. यामुळे तुमच्याकडे मानमरातबही चालत येईल.

# गरिबांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा पुरवाव्यात

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा युवा डॉक्टरांशी संवाद : राज्यपालांच्या उपस्थितीत एम्सचा पहिला पदवीदान समारंभ




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :** एम्ससारख्या एका प्रतिष्ठित संस्थेतून पदवी पूर्ण केल्यानंतर डॉक्टर म्हणून तुमच्यावर मोठी जबाबदारी आहे. गरिबांची निःस्वार्थ रुग्णसेवा करा. उपेक्षित भागापर्यंत जास्तीत जास्त अत्याधुनिक वैद्यकीय सोयीसुविधा पोहोचविण्यावर भर द्या, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन व नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत शनिवारी नागपूरच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचा (एम्स) पहिला पदवीदान दीक्षांत समारोह पार पडला. यावेळी खा. श्यामकुमार बर्वे, खा. राजेंद्र गोपछडे, आ. संजय मेश्राम, एम्सचे अध्यक्ष डॉ. अनंत पंढरे, कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, विदर्भाच्या ग्रामीण भागांमधील रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा देण्याचे आणि वैद्यकीय सुविधा पुरविण्याचे काम एम्सच्या माध्यमातून होत आहे. भविष्यात एम्सच्या कामाची आंतरराष्ट्रीय





स्तरावर दखल घेतली जावी, याहष्टीने प्रयत्न होतील, असा आशा आहे.ज्या सुविधा इतर रुग्णालयांमध्ये नाहीत, त्या एम्समध्ये मिळणे अपेक्षित आहे. विशेषतः उत्तर नागपूरसह पूर्व विदर्भात थॅलेसिमिया, सिकलसेलची मोठी समस्या आहे. या उत्तर नागपुरात तर हजारो रुग्ण आहेत. आता एम्समध्ये बोन मॅरो ट्रान्सप्लान्ट होत आहे, ही आनंदाची बाब आहे. त्यामुळे प्रादेशिक समस्या लक्षात घेऊन काम करणे अपेक्षित आहे, असेही गडकरी म्हणाले.

### गडकरी हे भारताचे केनेडी !

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी पदवीदान समारंभानंतर डॉक्टरांचे आणि व्यवस्थापनाचे कौतुक केले. त्याचवेळी त्यांनी ना. श्री. गडकरी यांच्याविषयी गौरवोद्गार काढले. ते म्हणाले, देशाच्या विकासात चांगले रस्ते महत्त्वाची भूमिका बजावतात, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ केनेडी म्हणायचे. गडकरींनी देशभरात केलेले काम बघून मी त्यांना भारताचे जॉन एफ केनेडी मानतो. त्यांच्या या वाक्याला टाळ्यांचा कडकडाट झाला.

**चांगला डॉक्टर चांगला माणूस असावा**

वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर डॉक्टर म्हणून समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते. पण चांगला माणूस चांगला डॉक्टर असणे आवश्यक आहे. चांगले काम केले की प्रगती आपोआप होते, असा सल्लाही नितीन गडकरी यांनी यावेळी दिला.

# काँग्रेसच्या प्रवक्त्याविरुद्ध गुन्हा दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटकर याला तेलंगणात पळून जाण्यास मदत करणाऱ्या प्रशिक पडवेकर याच्याबाबत मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला म्हणून काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांच्याविरुद्ध गणेशपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे.

भाजपचे आमदार प्रवीण दटके, आ. कृष्णा खोपडे आणि भाजपचे शहराध्यक्ष बंटी कुकडे यांच्या नेतृत्वात तक्रार देण्यात आली होती. शिवद्रोही प्रशांत कोरटकर याची चंद्रपुरातील आलिशान हॉटेलात मुक्कामाची व्यवस्था करण्यापासून तर तेलंगणा राज्यात पळूण जाण्यात मदत करण्यापर्यंत भाजपच्या एका बड्या नेत्याच्या नागपूर कार्यालयात काम करणारा भाजप कार्यकर्ता प्रशिक पडवेकर आघाडीवर होता. कोरटकर याला तेलंगणात पळवून नेण्यात भाजप सहभागी आहे असा आरोप कॉंग्रेसते प्रवक्ते अतूल लोंढे यांनी केला होता मुख्यमंत्री खरेच शिवप्रेमी असाल तर खरी माहती लोकांना द्यावी, असेही ते म्हणाले होते.

त्यामुळे भारतीय जनता पक्षामध्ये खळबळ उडाली. भाजपचे आमदार प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, शहरअध्यक्ष बंटी कुकडे यांच्यासह शेकडो भाजपचे कार्यकर्ते गणेशपेठ पोलीस ठाण्यात हजर होते. त्यांनी अतुल लोंढे मुदार्बादचे नारे लावले. मुख्यमंत्र्यांची विनाकारण बदनामी करणे, दोन समाजात तेढ निर्माण करणे या कलमाखाली गुन्हे दाखल करण्याची मागणी भाजपचे बंटी कुकडे यांनी केली होती.






# शिवाजी महाराजांना एका समाजापुरतेच मर्यादित करू नका

## अजित पवार यांची विनंती



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २९ :** छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जाती आणि बारा बलुतेदारांना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. महाराजांनी कधीही जात, धर्मात भेदभाव केलेला नाही. त्यांचा एकंदरीत इतिहास पाहिला तर वेगवेगळ्या समाजातील, समाजाचे, धमार्चे, पंथाच्या लोकांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी महाराजांना मनापासून साथ दिलेली आहे. मात्र, काहीजण वेगळ्या पद्धतीने इतिहास लोकांच्या समोर आणण्याचा प्रयत्न करतात. कृपा करून महाराजांना एका समाजापुरतेच मर्यादित करू नका, महाराज सर्वांचे होते, असा सल्ला अजित पवार यांनी दिला आहे.

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वढू बु. येथील महाराजांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. या नंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते.

अजित पवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे कोणत्या एका समाजाचे नव्हते तर ते हिंदवी स्वराज्याचे होते. छत्रपती संभाजी महाराज यांना देखील पुढील काळामध्ये केवळ ९ वर्षे मिळाली. मात्र त्यांनी देखील अशाच पद्धतीने काम केले. शौर्य कसे असावे याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे संभाजी महाराज होते. आपल्यातील लोकांनी फितुरी केली आणि त्यातून जो इतिहास घडला तो सर्वांपुढे असल्याचे अजित पवार म्हणाले.

फुले-शाहू-आंबेडकरांची यांची विचारधारा जशी आहे, ज्यात सर्व जाती धमार्तील लोकांना बरोबर घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे. त्याकरता सर्वांनी सहकार्य करावे, सर्वांनी साथ द्यावी, त्यातूनच राज्याचे भले होणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

# आदित्य ठाकरेंच्या बदनामीचे षडयंत्र

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २९ :** दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्यावर न्वयाने आरोप करण्यात आल्याने राजकारण तापले असून, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मोठा दावा केला आहे.



दिशा सालियन प्रकरणात मालवणी पोलिसांनी कालच क्लोजर रिपोर्ट दिला आहे. या प्रकरणात आदित्य ठाकरे यांना बदनाम करण्याचं राजकीय षडयंत्र सुरू आहे, मी गृहमंत्री असल्यापासून सांगत आहे, की हे एक षडयंत्र आहे, आणि हेच सत्य आहे, असं अनिल देशमुख म्हणाले.

दिशा सालियन प्रकरणात तिचे वडील सतीश सालियन यांनी मुंबई हाय कोर्टात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्यावर आरोप करण्यात येत आहेत. पोलिसांनी क्लोजर रिपोर्ट दिल्यानंतरही आदित्य ठाकरे यांना गोवण्याचा प्रकार सुरू असल्याचे देशमुख म्हणाले.








■ **अमरावती -** जिल्ह्यातील सावरखेड येथे खोरगडे वाडा मध्ये गुढी पाडव्याच्या पुर्वसंध्येला मॉडेल पूनम जामोदकर, सोनाली भास्कर यांचे छायाचित्रकार प्रतिक रोहणकर यांनी आकर्षक छायाचित्र टिपले.

# शिंदे गट कामराचा खून करणार का?

## संजय राऊत यांचा सवाल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :** महाराष्ट्रात एकप्रकारे गुजराज किंवा उत्तर प्रदेश पॅटर्न राबवला जात आहे. महाराष्ट्र थोडासा वेगळा आहे असे आम्हाला वाटले होते पण देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे त्याच मार्गाने चालले आहेत. अजित पवार यांचा मार्ग मला वेगळा दिसत आहे, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.



संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, अजित पवारांना हे सर्व माहिती असल्याने त्यांची भूमिका आणि भाषा वेगळी आहे. पण ते कैचीमध्ये अडकलेले दिसून येत आहे. कुणाल कामरा आणि माझे कालच बोलणं झाले. मी त्याला सांगितले की आपण कायद्याला सामोरे गेले पाहिजे. कुणाल कामरा हा अतिरेकी, देशद्राही कोण आहे तो? तो काय अल कायदाचा मेंबर आहे का? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, कुणाल कामरा हे देशातील एक कलाकार, कवी, लेखक आहेत. शिंदेंचे कुणाबरोबर फोटो आहे ते आम्ही बाहेर काढू का? कुणाल हा फुटीरतावादी आहे का? हा देश संविधानावर चालतो. कुणी जर कायदेशीर कारवाई केली असेल तर त्याला सामोरे गेले पाहिजे.

संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या गटातील लोकांना कुणाल कामरा जर शस्त्रू वाटत असेल तर आम्ही त्याच्याशी बोलायचे नाही का? आम्हालाही वाटते पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा हे महाराष्ट्राचे शत्रू आहेत, पण एकनाथ शिंदे आणि त्यांचे लोकं त्यांच्या पायाशी जाऊन बसतात, अशा शब्दात संजय राऊत यांनी तोफ डागली.











